शुक्रवार, ७ एप्रिल २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२१५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●FRIDAY 7 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-215 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-14 ●PRICE-5

# ए.के अँटनींचा मुलगा भाजपात



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : काँग्रेस नेते आणि माजी केंद्रीय मंत्री ए.के अँटनी यांचा मुलगा अनिल अँटनी यांनी भाजपात प्रवेश केला आहे. भाजपा नेते पीयूष गोयल, वी. मुरलीधरन आणि केरळचे प्रदेशाध्यक्ष के. सुरेंद्रन यांच्या उपस्थितीत अनिल अँटनी यांनी भाजपात प्रवेश केला. अनिल अँटनी हे केरळ काँग्रेसचे सोशल मीडिया प्रमुख होते.**

अलीकडेच 'बीबीसी'ने गुजरात दंगलीबाबात एक माहितीपट प्रदर्शित केला होता. 'इंडिया: द मोदी क्वेशन' नावाच्या या माहितीपटातून गुजरात दंगलींमध्ये तत्कालीन गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहेत. या माहितीपटावर केंद्र सरकारने बंदी आणल्यानंतर काँग्रेससह विरोधीपक्षांनी मोदी सरकारवर टीकास्त्र सोडले होते. तर, अनिल अँटनी यांनी या माहितीपटाला विरोध केला होता. तसेच, जानेवारी महिन्यात अनिल अँटनी यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली होती. भाजपात प्रवेश केल्यानंतर अनिल अँटनी यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सांगितले, अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांना वाटते, की एका कुटुंबासाठी काम करणे हा त्यांचा धर्म आहे. पण, देशासाठी काम करणे हे मला महत्वाचे वाटते. जगात भारताला एका वेगळ्या उंचीवर नेण्यासाठी पंतप्रधान मोदी काम करत आहेत. तर, जे. पी. नड्डा आणि अमित शाह हे समाजासाठी चांगले काम करण्याची इच्छाशक्ती बाळगतात. आता देश मजबूत करण्यासाठी मी काम करणार आहे, असे अनिल अँटनी यांनी म्हटले.माझे वडिल ए.के अँटनी यांचा मी खूप आदर करतो. संपूर्ण कुटुंब माझ्याबरोबर आहे. राजकीय गोष्टीवर मला भाष्य करायचे नाही. पण, माझे त्यांच्यावर प्रेम आहे, असे अनिल अँटनी म्हणाले.

## काँग्रेसला मोठा धक्का



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री ए. के. अँटनी यांच्या मुलाने भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला आहे. दरम्यान, ए. के. अँटनी यांनी त्यांच्या मुलाच्या निर्णयाबाबत दु:ख व्यक्त केले. वृत्तसंस्था एएनआयने दिलेल्या वृत्तानुसार तिरुअनंतपुरम येथे माध्यमांशी बोलताना ए. के अँटनी म्हणाले की, अनिलच्या भाजपात प्रवेश करण्याच्या निर्णयामुळे माझे मन दुखावले आहे. हा अत्यंत चुकीचा निर्णय आहे. आपल्या भारत राष्ट्राचा मुख्य आधार म्हणजे आपली एकता आणि धार्मिक सलोखा आहे. परंतु २०१४ नंतर मोदी सरकार सत्तेत आल्यापासून ते (भाजपा) पद्धतशीरपणे देशाच्या विविधतेचे आणि धर्मनिरपेक्षतेचे नुकसान करत आहेत. ते केवळ एकसमानतेवर विश्वास ठेवतात. ते देशाच्या संवैधानिक मूल्यांना उद्ध्वस्त करत आहेत. माझी निष्ठा नेहमीच नेहरू परिवारासोबत राहील, असेही ए. के. अँटनी यांनी ठणकावून सांगितले. अनिल अँटनी यांच्या भाजपा प्रवेशाच्या कार्यक्रमाला भाजपा नेते पीयूष गोयल, व्ही. मुरलीधरन आणि केरळचे भाजपा प्रदेशाध्यक्ष के. सुरेंद्रन उपस्थित होते. जानेवारी महिन्यात अनिल अँटनी यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली होती. अनिल अँटनी यावेळी म्हणाले की, बऱ्याच काँग्रेस कार्यकर्त्यांना असे वाटते की, एका कुटुंबासाठी काम करणे हा त्यांचा धर्म आहे. पण, देशासाठी काम करणं माझ्यासाठी महत्वाचे आहे. जगात भारताला एका वेगळ्या उंचीवर नेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी काम करत आहेत. तर, जे. पी. नड्डा आणि अमित शाह हे समाजासाठी उत्तम काम करण्याची इच्छाशक्ती बाळगतात.




# राहुल गांधींना बिनबुडाचे आरोप करण्याची सवयच

## केंद्रीय अर्थमंत्री सीतारामन यांची टीका

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी राहुल गांधींवर टीका केली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर तिखट शब्दांत निर्मला सीतारमण यांनी टीका केली आहे. अदाणी प्रकरणावरून राहुल गांधी सध्या आक्रमक झाले आहेत. अदाणींच्या शेल कंपन्यांमध्ये २० हजार कोटी कुठून आले? असा प्रश्न विचारत आहेत. यावर आता निर्मला सीतारमण यांनी प्रत्युत्तर दिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात बिनबुडाचे आरोप करण्याची राहुल गांधींना सवय आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधीही आपल्याला सगळ्यांनाच याचा प्रत्यय आला आहे. आता पुन्हा एकदा अदाणी अदाणी हे नाव घेत ते अकारण बिनबुडाचे आरोप करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींवर खोटे आरोप करून राहुल गांधी तोंडावर पडतात तरीही त्यातून बोध घेत नाहीत असेही निर्मला सीतारमण यांनी म्हटले आहे. केरळ सरकारने अदाणी यांना केलेल्या मदतीविरोधात आणि राजस्थानच्या कंपनीने जे सौर उर्जा योजनेचं काम अदाणींना दिलं आहे त्याबाबत राहुल गांधी काहीच का बोलत नाहीत? याबाबत बोलण्यासाठी राहुल गांधींना कुणी अडवले आहे असेही निर्मला सीतारमण यांनी म्हटले आहे. तत्कालीन काँग्रेस सरकार केरळमध्ये असताना एका बंदरासंदर्भातला प्रकल्प कुठलीही निविदा न काढता अदाणींना देण्यात आला होता. आता केरळमध्ये काँग्रेसचे सरकार नाही तिथे माकपची सत्ता आहे मात्र त्याबाबत राहुल गांधी यांनी सोयीस्कर मौन स्वीकारले आहे.

# लग्नसराईत सोन्याच्या किंमतीत विक्रमी वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** बुधवार, दि. 5 एप्रिल रोजी सोन्याच्या किमतीत नवा विक्रम नोंदविला गेला. 10 ग्रॅम सोन्याची किंमत पहिल्यांदाच 61 हजारांवर जाऊन पोहोचली तर चांदीनेही 74 हजारांचा टप्पा पार केला. गुरुवारी सोन्याचा दर 60 हजार 850 प्रती तोळा आहे तर चांदीचा दर 76 हजार 200 आहे. ऐन लग्नसराईच्या दिवसांत सोन्यांच्या किंमतींनी साठी गाठल्यामुळे सामान्य नागरिकांना मोठा फटका बसला आहे. येत्या काळात सोन्याच्या किंमतीत वाढ होणार असून 71 हजारांवर सोन्याच्या किंमती जाण्याची शक्यता आहे. सोन्याचे दर गेल्या अनेक महिन्यांपासून वाढत चालले आहेत. मात्र दर वाढले असले तरी सोने खरेदीमध्ये फरक पडलेला नाही. ग्राहकांचा तितकाच प्रतिसाद सोने खरेदीला आहे. पण या वेळी सोन्याने नवीन विक्रम केला. 5 एप्रिलला सर्वाधिक सोन्याचे दर बघायला मिळाले आहेत जगातील मार्केटमध्ये अस्थिरता निर्माण झाली आहे.


स्टॉक मार्केटची घसरण झाली आहे. त्यात रशिया युक्रेन युद्धही झाले आहे. त्यामुळे सोन्यांच्या किंमतीत सातत्याने वाढ होत आहे. मात्र गुंतवणूक म्हणून सोन्याची खरेदी करावी, असे पी.एन.जी ज्वेलर्सच्या सौरभ गाडगीळ यांनी सांगितले आहे. सराफा बाजार कायम गजबजलेला असतो. मात्र सोन्याच्या दरात विक्रमी वाढ झालेली असताना देखील लोक सोने खरेदी करताना दिसत आहेत. सध्या लग्नाचा काळ सुरु आहेत त्यामुळे अनेक लोक सोने खरेदी करताना दिसत आहेत. सोन्याच्या किंमती वाढत आहे. त्यासोबतच विक्रीत देखील वाढ होत आहे. अनेक नागरिक सोने खरेदी करताना दिसत आहेत. सोन्यात गुंतवणूक करतानाही दिसत आहेत. तुम्हाला जरी सोन्यात गुंतवणूक करणे आवडत असले तरी तुम्ही त्यात मर्यादित गुंतवणूक केली पाहिजे, असे काही तज्ज्ञांचे मत पडले.


# अभिनेता नानीच्या 'दसरा' चित्रपटाचा बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** दाक्षिणात्य अभिनेता नानी व अभिनेत्री किर्ती सुरेश मुख्य भूमिकेत असलेल्या 'दसरा' चित्रपटाचा बॉक्स ऑफिसवर बोलबाला आहे. सध्या या चित्रपटाची सर्वत्र चर्चा आहे. ३० मार्चला रामनवमीच्या मुहुर्तावर प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने अवघ्या सहा दिवसांत १०० कोटींची कमाई केली आहे. नानीच्या 'दसरा'ने प्रदर्शनाच्या दिवशी १७ कोटींची कमाई केली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी १२ कोटींची कमाई करत या चित्रपटाने अवघ्या दोन दिवसांत जगभरात ५३ कोटींचा गल्ला जमवला होता. आता चित्रपचट प्रदर्शनाच्या सहा दिवसांतच दसरा चित्रपटाने १०० कोटींच्या क्लबमध्ये एन्ट्री केली आहे. या चित्रपटाने जगभरात १०० कोटींचा गल्ला जमवला आहे. नानीच्या 'दसरा' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकुळ घातल्याचे पाहायला मिळत आहे. ६५ कोटींचं बजेट असलेल्या या चित्रपटाचा बॉक्स ऑफिसवर बोलबाला आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांकडूनही भरभरुन प्रेम मिळत आहे. हा चित्रपट तमिळ, कन्नड, मल्याळम व हिंदी अशा चार भाषांमध्ये प्रदर्शित करण्यात आला आहे. 'दसरा' हा नानीचा सिनेमा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला आहे. नानी आणि किर्ती सुरेशची केमिस्ट्री प्रेक्षकांना आवडली आहे. हा दाक्षिणात्य सिनेमा भारतीय सिनेरसिकांना भावला आहे. सिनेमाचा विषय आणि आशय खरंच विचार करायला लावणारा आहे. विकेंडला या सिनेमाने चांगली कमाई केली आहे. पण रिलीजच्या पहिल्या सोमवारी हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर जोरदार आपटला आहे. या सिनेमाने सोमवारी फक्त चार कोटींची कमाई केली आहे. आतापर्यंत या सिनेमाने 61.5 कोटींचा गल्ला जमवला आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# अजिंठ्याच्या लेण्यांतून घडणारे बुद्ध दर्शन

आधुनिक केसरी

औरंगाबाद जिल्ह्यात जगप्रसिद्ध अशी अजिंठ्याची लेणी आहेत. अर्धवर्तुळाकार किंवा घोड्याच्या नालेच्या आकाराची ही लेणी पाहिली की मला कधी कधी मुंबईच्या नरिमन पॉईंटची आठवण येते. नरिमन पॉईंटच्या भोवती सिमेंटचे जंगल आहे. पण ही अजिंठ्याची लेणी अत्यंत निसर्गरम्य वातावरणात वसलेली आहेत. गोलाकार अशा हिरव्याकंच टेकडीवर ही लेणी आहेत. खाली वाघुरा नदीचे खळाळते पात्र आहे. आजूबाजूला प्रचंड मोठे डोंगर आहेत. निसर्गाच्या कुशीत अलगद वसलेली ही मानवी प्रतिभेतून निर्माण झालेली प्रतिसृष्टी. ज्याच्या कोणाच्या डोक्यातून या ठिकाणी अशी अप्रतिम काळावर अमीट ठसा उमटवणारी ही कलाकृती निर्माण करण्याची कल्पना जन्म पावली, त्याच्या सौंदर्य दृष्टीचे कौतुक करायला शब्द कमी आहेत. अजिंठा, वेरूळची लेणी हा आपला अत्यंत अभिमानास्पद असा जागतिक सांस्कृतिक वारसा आहे. संपूर्ण जगातून येथे पर्यटक येतात. पण आपल्याकडील या अनमोल ठेव्याचे महत्व आपल्याकडील लोकांना तेवढे वाटत नाही. अजिंठ्याला आता काय राहिले आहे, वेरूळची लेणी तर बरीचशी भग्न झालेली आहेत असे म्हणून आपणच त्यांचे महत्व कमी करतो. अजिंठा लेणी तर इ.स. पूर्व दुसऱ्या तिसऱ्या शतकात निर्मिलेली एवढी प्राचीन आहेत. त्या काळातील वैभवशाली इतिहासाची, संस्कृतीची आणि लोकजीवनाची साक्ष देत ती आजही उभी आहेत. वाकाटक राजांच्या काळात त्यांची निर्मिती झाली. बौद्ध धर्मात हीनयान आणि महायान असे दोन पंथ आहेत. हीनयान पंथीय लोक मूर्तिपूजा करीत नाहीत, तर महायान पंथीय भगवान बुद्धांच्या मूर्तीची पूजा करतात. अजिंठा लेणीतील काही लेणी हीनयान या पंथातील तर काही लेणी महायान पंथातील लोकांशी संबंधित आहेत. पण प्रामुख्याने अजिंठा लेणी जगप्रसिद्ध आहेत ती तेथील अजरामर चित्रांसाठी. त्या काळातील चित्रकार आणि शिल्पकार यांच्या कलाकौशल्याचे वर्णन करण्यासाठी शब्द अपुरे आहेत.





## आनंदी पहाट

# आयुष्य सार्थ करणारी अर्थप्राप्ती

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या हातात “अर्थ” आहे तर आणि तरच आपलं जीवन समर्थ आहे आणि आयुष्याला अर्थ आहे, अशी सद्यःस्थिती असल्याचं आपण प्रत्येकजण अनुभवत आहोत. अर्थात पैसा कमवणे आणि जमवणे हे तो गमावण्यापेक्षा अधिक कष्टप्रद असतं. आपण मिळवलेला पैसा कमवायला आणि जमवायला जो वेळ लागतो त्याच्या तुलनेनं गमवायला काहीच वेळ लागत नाही. गमवलेला पैसा परत मिळवता येऊ शकेलही, परंतु तो कमवण्यासाठी गमवलेला वेळ मात्र परत मिळवता येत नाही, याचं भान आपण सर्वप्रथम ठेवणं आवश्यक असतं. अनेकदा आपण करायला गेलो एक आणि झालं भलतंच, असा अनुभव प्रत्येकाच्या आयुष्यात कधी ना कधी येतोच. अशावेळी केवळ आपला पैसाच आपल्या उपयोगी पडतो, याची जाणीव आपल्याला होणं हेदेखील तितकंच महत्वाचं असतं. आपल्यापैकी नोकरी व्यवसाय करणाऱ्या तसंच न करणाऱ्या प्रत्येकानं आर्थिक व्यवहाराच्या महत्त्वपूर्ण बाबी समजूत घेतल्या पाहिजेत. हाती असलेल्या पैशाचा केवळ गरजेपुरता उपयोग करून बचतीचं तंत्र अवगत केलं पाहिजे. यासाठी आपण प्रत्येकवेळा अगदी प्रत्येक बाबतीत काटकसरच केली पाहिजे असं काही नाही. पण पैसे खर्च करण्यापूर्वीच आपल्या गरजांची योग्यता, त्यांची आपण करत असलेली अपेक्षा आणि त्यांची पूर्तता या सर्वच बाबींचा अभ्यासपूर्वक विचार केला पाहिजे. या गरजा निश्चित केल्या, कि माघार घेऊन पैसे वाचवण्याची आवश्यकता नाही. आपल्या गरजांची पूर्तता झाल्यावर शिल्लक राहणाऱ्या पैशाची बचत करण्याकडे अनेकांचा कल असतो. अर्थात ते स्वाभाविकच असतं. परंतु या व्यतिरिक्त निराळं तंत्र आपण आत्मसात करून केलेली बचत अधिक चांगल्याप्रकारे होऊ शकते.



आधुनिक केसरी

**ज्ञानाच्या रेड्याचे | भाग्य लाभो ||**

आप पर भाव | राहु नये मनी ||
शुद्ध ऐसी वाणी | लाभो मज ||
ध्यास मज लागो | आत्मचिंतनाचा ||
विषयो दुजांचा | नको मनी ||२||
जरी वावरतो | देहाने जनात ||
परि अंतरात | हरि नांदो ||३||
संसार सागरी | वेदना अपार ||
संतांचा आधार | सुखदायी ||४||
बोबडे हे बोल | अजाण बाळाचे ||
ज्ञानाच्या रेड्याचे | भाग्य लाभो ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**कृपां कुरुष्व मातस्त्वं
सिंहध्वजे शवासने |
एकवीरे नमस्तुभ्यं
श्रीरेणुके नमो नमः || 5 ||
हे माते सिंहध्वजे, शवासने, तू कृपा कर. एकवीरे, तुला नमस्कार असो. तुला नमस्कार असो. श्रीरेणुके, तुला नमस्कार असो. तुला नमस्कार असो.**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**श्वाँसा महँग अमूल्य है, गिन गिन लाव अनन्त । धोखा में जनि खोवहू, फिर दुख पावहु अन्त ।।४६।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय) ०४/०६/४६**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

मानव जीवन अमूल्य आहे. या अमूल्य श्वासनिधीला इतरत्र न लावता एक एक श्वास परमेश्वराच्या भक्तीत, उपासनेत लावा. या श्वासाला संसाराच्या भ्रमात नष्ट करू नका अन्यथा अशी सुवर्णसंधी परत मिळणार नाही आणि अंती तुम्ही जन्म-मृत्यूच्या दुःखाला प्राप्त कराल. म्हणून सर्व कामनांचा त्याग करून एकमात्र परमेश्वराची भक्ती करा.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# देहांतनिरूपण

आधुनिक केसरी

मित्रांनो आता पर्यन्त आपण 'देहांतनिरूपण'या समासात जन्म व मरण परमात्मा, परमेश्वर, सद्गुरू व त्यांचे आपल्या साधकाच्या कल्याणाप्रती असलेले सन्मार्गाचे विचार अभ्यासले. आता आपण समासाच्या शेवटा कडे आलो आहोत, तर संपूर्ण समासाचा विचार केला तर समर्थ आपल्याला सन्मार्गाचा रस्त्यावर आणून ठेवतात, असे दिसुन येते,पण हा रस्ता तुम्हाला केव्हा सापडेल! मित्रांनो , जर तुम्ही सत्पुरुषांची संगत धरली,सद्गुरु चे विचार आपल्या जगण्यात उतरवले परमात्म्याची मनापासून भक्ति केली तर सामान्य माणसं पवित्र होतात व आपल्या जीवनाचा उध्दार करतात. म्हणून सतत सद्गुरू ला शरण जावे. ते सांगतील ते विचार आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणावे. परमात्मा नीट समजून घ्यावा. त्याच्या प्रत्येक शब्दांवर विश्वास ठेवावा. कितीही अडचणी आल्या, साधकाच्या जीवनात संसाररूपी वाटेवर चालत असताना अनेक काटे वेळोवेळी बोचले, अनेक खड्डे लागले त्यात पडला , ठेच लागली




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# अहंपणा टाकल्यास प्रपंचातील लाभ-हानी झेलता येईल

आधुनिक केसरी

प्रपंच हा परमेश्वरप्राप्तीच्या आड कधीही येऊ शकत नाही. आपण पाहतोच की प्रपंचात आपला कितीतरी लोकांशी निरनिराळ्या स्वरूपांत संबंध येतो. आई-वडील, बायको-मुले, बहीण-भाऊ, इतर सगेसोयरे, मित्र आणि इतर जन या सर्वांचा उत्तम उपयोग करायचा असेल तर या सर्वांशी व्यवहार करताना आपण आपली सर्व कर्मे एका हरिस्मरणाच्या धाग्यात जोडून करावीत, म्हणजे सर्वांशी संबंध सलोख्याचे राहून प्रपंच फारच सुखकर होईल; निदान तो तापदायक तरी खचित होणार नाही. या सर्वांशी संबंध बिघडायला आपला अभिमान, अहंपणा, विशेषकरून कारणीभूत होत असतो. हा अभिमान श्रीमंतालाच असतो असे नव्हे तर गरिबालाही तो सोडत नाही. आपण पुराणात वाचले आहेच की, हिरण्यकश्यपूला जेव्हा भगवंतांनी मांडीवर घेऊन पोट फाडायला सुरुवात केली तेव्हा त्याचा हात अभिमानाने तलवारीकडे गेला, प्रत्यक्ष भगवंत समोर असूनही त्याने काही हात जोडले नाहीत. केवढा हा अभिमानाचा जोर ! गरीब लोकसुद्धा या अभिमानाच्या आहारी किती गेलेले असतात ! एकदा एक भिकारी एकाच्या दाराशी येऊन भिक्षा मागू लागला, तेव्हा तो गृहस्थ त्या भिकाऱ्याला म्हणाला, “अरे ! तुला काही काळवेळ समजते की नाही ?” त्यावर तो भिकारी म्हणाला, “जा जा ! मला काही तुमचे एकट्याचेच घर नाही, गावात अशी शंभर घरे आहेत !” पाहा, अभिमानाचे तण किती खोल गेलेले असते ते ! अभिमान हा शेतात उगवणाऱ्या हरळीसारखा आहे. ही हरळी समूळ नाहीशी केल्याशिवाय चांगले पीक हाती लागत नाही, त्याप्रमाणे अभिमान संपूर्णपणे नाहीसा झाल्याशिवाय परमेश्वरी कृपेचे पीक येणेच शक्य नाही. फणस चिरताना एक काळजी घ्यावी लागते; हाताला तेल लावून तो कापावा लागतो आणि त्यातले गरे काढावे लागतात, म्हणजे हाताला चिकाचा त्रास न होता गरे चटकन् निघतात. त्याप्रमाणे, नाम घेऊन प्रपंचात व्यवहार केला, तर अभिमानाचा किंवा विषयवासनांचा चीक न लागता परमेश्वरी कृपेचे गरे हस्तगत करता येतात. हा अहंपणा, हा देहाभिमान टाकला तर प्रपंचातली लाभ-हानी हसतखेळत झेलता येईल. लहान मुले पावसाळ्यात कागदाच्या लहान लहान होड्या करून पाण्यात सोडतात, त्यांतली होडी तरली तरी हसतात, बुडाली तरी हसतात; त्याप्रमाणे प्रपंचातली सुखदुःखे हसतखेळत झेलावीत; आणि हे एका नामानेच साधते.



**आजचे बोधवचन आहे - नामस्मरण म्हणजे 'तू आहेस, मी नाही' ही स्थिती होय. श्रीराम समर्थ**

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

देवाविण भक्ता । कोण देता निष्कामता ॥२॥
तुका म्हणे बाळ । माता जैसें स्नेहजाळ ॥३॥
विश्वाचा जनिता । म्हणे यशोदेसि माता ॥१॥
ऐसा भक्तांचा अंकित । लागे तैसी लावी प्रीत ॥ध्रु.॥
निष्काम निराळा । गोपी लावियेल्या चाळा ॥२॥
तुका म्हणे आलें । रूपा अव्यक्त चांगलें ॥३॥
काय दिनकरा । केला कोंबड्यानें खरा ॥१॥
कां हो ऐसा संत ठेवा । भार माझे माथां देवा ॥ध्रु.॥
आडविलें दासीं । तरि कां मरती उपवासी ॥२॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, ७ एप्रिल २०२३



# काकाजी ते चंदूसेठ

## आदर्श पत्रकारितेचा वसा आणि वारसा

आधुनिक केसरी

**स्व. मोहनलालजी (काकाजी) बियाणी यांनी दैनिक मराठवाडा साथीच्या माध्यमातून घेतलेला आदर्श पत्रकारितेचा वसा त्यांचे सुपुत्र चंदूलालजी (चंदूसेठ) बियाणी हे बंधू सतीश बियाणी व जगदीश बियाणी यांच्या साथीने समर्थपणे पुढे नेत आहेत. त्यांच्याच संकल्पनेतून मागील तीन वर्षांपासून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व दै.मराठवाडा साथीच्या वतीने महाराष्ट्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पत्रकारितेतील व्यक्तींचा गौरव करण्यात येत आहे. पत्रमहर्षी स्व. मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार - 2023 चा वितरण सोहळा शुक्रवार, दि. 7 एप्रिल 2023, सायं. 5.30 वाजता हॉटेल वर्षा इन, अम्बॅसेडर हॉटेलमागे, टाऊन सेंटर, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडत आहे. यानिमित्त स्व. मोहनलालजी बियाणी व चंदूलालजी बियाणी यांच्या कार्याचा येथे धावता आढावा घेण्यात आला आहे.**

## स्मृती प्रेरणादायी

दैनिक मराठवाडा साथीच्या कार्यालयात काम करीत असताना वास्तविक पाहता मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक मोहनलालजी (काकाजी) बियाणी यांची सातत्याने उणीव भासते. परंतू ते आमच्या आसपासच आहेत, एखाद्या बातमीबद्दल मत किंवा घटनेबाबत ते प्रतिक्रिया व्यक्त करीत आहेत असा भास झाल्याशिवाय राहत नाही. काकाजींची स्मृती ही आमच्या सर्वांसाठी एक प्रेरणा असून आज त्यांच्या नावाने पत्रकारांचा गौरव करताना त्यांचा एकुण पत्रकारितेचा प्रवास समोर आल्याशिवाय राहत नाही. वृत्तपत्र काढणे सोपे असते परंतु त्यात सातत्यपुर्णता ठेवण्यासोबत वृत्तपत्र वाचकाभिमूख असणे तेवढेच महत्वाचे आहे. हल्ली दररोजच वेगवेगळी वर्तमानपत्रे प्रकाशित होताना दिसत असतात, त्यातील बातम्या आणि साहित्य यावरही चर्चा होताना दिसते. दै. मराठवाडा साथीचे मुख्य संपादक स्व. मोहनलालजी बियाणी यांनी मात्र अत्यंत प्रतिकुल परिस्थितीचा सामना करीत असताना केवळ वृत्तपत्र चालविले नाही तर अनेक पत्रकारसुद्धा त्यांनी घडविले आहेत. मराठवाडा साथीचे वर्णन करताना आमच्यासारख्या अनेक पत्रकारांना घडविणारे काकाजी हे खऱ्या अर्थाने पत्रकारितेचे चालते-बोलते विद्यापीठच म्हणावे लागेल. साधारणपणे 30 वर्षाखाली वृत्तपत्रे ट्रेडल प्रेसवर तयार केली जात होती. एक-एक अक्षर गोळा करायचे, त्याच्या ओळी करुन बातमी तयार करायची आणि ट्रेडलवर घड्या मारुन प्रिन्ट करायचे असे वृत्तपत्र छपाईचे स्वरुप होते. काकाजींनी त्या काळात सुरु केलेली पत्रकारिता आज नव्या वळणावर जात असतांना यामागे घेतलेले त्यांचे कष्ट समोर येते. एखादा मनुष्य किती जगला यापेक्षा तो कसा जगला याला मोठे महत्व असते. काकाजींनी आपल्या जीवनात अनेक पत्रकार घडविले असून आज ही मंडळी वेगवेगळ्या क्षेत्रात काम करतांना दिसून येतात. बातमी कशी असावी यापासून वृत्तपत्र बातमीचे स्थान कोठे आणि किती असावे याबाबत काकाजी नेहमीच मार्गदर्शन करतांना दिसून आले आहेत. मी सुमारे 20 वर्षापासून मराठवाडा साथीत कार्यरत असून काकाजींच्या माध्यमातून घडलेल्या पत्रकारांची यादीच समोर येते. मुंबईच्या प्रहारमध्ये कार्यरत असलेले व आपल्या समाज प्रबोधन कीर्तनाने समोर आलेले ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर, माहिती कार्यालयात कार्यरत असलेले शाम टरके, गोव्याच्या पुढारीमध्ये सेवा केलेले बाबा देशमाने यांच्यासोबतच लक्ष्मण वाकडे, ज्ञानोबा सुरवसे, ना.धनंजय मुंडे यांचे स्वीय सहाय्यक प्रशांत जोशी, माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांचे स्वीय सहाय्यक प्रदीप कुलकर्णी, चंद्रशेखर फुटके, धनंजय आढाव, बालासाहेब कडबाने, सुधीर गोस्वामी अशी किती तरी नावे घेता येतील. आम्ही सर्व मंडळी काकाजी नावाच्या चालत्या-बोलत्या पत्रकारितेच्या विद्यापीठात शिकलेलो आहोत याचा मनापासून आनंद वाटतो. निवडणूका म्हटलं की, आरोप-प्रत्यारोप होत असतात. अशावेळी बातमी प्रसिद्ध करतांना काय खबरदारी घ्यावी याबाबत केलेल्या सूचना अजूनही आठवतात. नेतेमंडळी म्हणजेच लोकप्रतिनिधी आपल्या भाषणात आरोप करीत असतात परंतु आरोपाची उंची तपासून कोणाचीही प्रतिष्ठा लयास जाणार नाही अशा पद्धतीने निवडणूकींच्या बातम्या प्रसिद्ध करण्याचे ते सांगत. परळी आणि बीड जिल्ह्यात नेहमीच राजकारण महत्वाचे ठरलेले आहे. या पार्श्वभूमीवर राजकारणांच्या बातम्यांपेक्षा विकासाच्या बातम्यांवर भर देत रहा... असे ते नेहमीच सांगत. परळी-बीड-अहमदनगर रेल्वेमार्गासंदर्भात रेल्वे समिती म्हणून त्यांनी तर काम केलेच आहे परंतु आपल्या बातमीतून या मार्गाची गरज जनतेसमोर ठेवण्याचे ते सांगत होते.




अगदी गल्लीपासून थेट देशाची राजधानी दिल्लीपर्यंत हा मार्ग किती महत्वाचा आहे, त्याला निधी कसा मिळेल या बाबत लिहीत जा अशी सूचना ते नेहमीच करीत होते. मराठवाड्यातील औरंगाबाद नंतरचे सर्वात मोठे शासकीय रुग्णालय अंबाजोगाई येथे असून तेथे रिक्त जागा, उपचारासाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री, विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले हॉस्टेल्स् या प्रश्नांवर विशेष बातमी करण्याबाबत ते नेहमीच आग्रही असतात. परळी शहराचा विकास कसा होईल हा केंद्रबिंदू समोर ठेवून अनेक प्रश्नांवर किंबहूना विषयांवर काकाजींनी आम्हाला लिहीते केले आहे. बातमीदारी केवळ आपल्याला नाव कमाऊन देते असे नाही तर आपल्या गावाच्या प्रश्नांबाबत लिहील्यानंतर चांगल्या विषयांवर चर्चा होते असा सल्ला ते नेहमीच देतात. म्हणूनच आजही आम्हाला स्व. मोहनलालजी बियाणी चालते-बोलते विद्यापीठ वाटतात.

**प्रशांत प्र.जोशी, कार्यकारी संपादक, मराठवाडा साथी, मो.9822629833**

## बहुआयामी नेतृत्व

परळी वैजनाथ हे शहर बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग. वैद्यनाथ प्रभूंचे अधिष्ठान असल्याने धार्मीक तर वीज निर्मितीच्या माध्यमातून उर्जाशक्ती असे शक्ती केंद्र आहे. राज्याच्या राजकारणात नेहमीच परळी शहर केंद्रस्थानी राहिले असून अशा या शहरात काम करीत असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष चंदुलाल बियाणी हे आपल्या आगळया वेगळया सामाजिक, सांस्कृतिक कार्यातून सदैव लक्षवेधी ठरलेले आहेत. परळी शहराचे समाजकारण, अर्थकारण, राजकारण, उद्योग, क्रीडा, सांस्कृतिक, साहित्य, अशा सर्व क्षेत्रात चंदुलाल (चंदूसेठ) बियाणी यांनी आपल्या अलौकीक कामाचा ठसा उमटविला आहे. दै.मराठवाडा साथीचे मुख्य संस्थापक संपादक मोहनलालजी बियाणी यांच्या पत्रकारितेसोबतच सार्वजनिक कार्याचा आदर्श समोर ठेवून त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेवण्याचे काम चंदुलाल बियाणी यांनी केलेले आहे. परळी शहरात राजस्थानी पतसंस्था आणि मल्टीस्टेटच्या माध्यमातून चंदुलाल बियाणी यांनी अर्थकारण क्षेत्रात पदार्पण केले. मागील दहा वर्षापासून या दोन्ही संस्थेचे ते चेअरमन असून कर्ज वाटपातून अनेक संस्था उभारण्यासाठी तसेच सामान्य नागरिकांना उद्योग व्यवसायासाठी त्यांनी कर्ज दिलेले आहे. राजस्थानी मल्टीस्टेट आज दहा शहरात कार्यरत असून सामान्यांच्या पैशाला मोठी किंमत देत एक आर्थिक आधार म्हणून राजस्थानी मल्टीस्टेटकडे पाहिले जाते. चंदुलाल बियाणी यांनी परळी शहरात खऱ्या अर्थाने राजकारणाच्या पलीकडे जात समाजकारण आणि सांस्कृतिक परंपरा जोपासण्याचे, नव्याने त्या निर्माण करण्याचे काम केलेले आहे. परळी फेस्टिव्हल, प.पु.अलकाश्रीजीं यांची श्रीराम कथा, प्रसिद्ध शनि भक्त प.पु.विभाश्रीजी यांची शनि महात्म्य कथा, विविध साहित्यीक, कलाकार यांच्या उपस्थितीत नेहमीच होणारे कार्यक्रम हा चंदुलाल बियाणी यांनी सर्वसामान्यांसाठी उभा केलेले एक व्यासपिठच होते. आजही मराठवाडा साथीच्या माध्यमातून परळी भुषण पुरस्कार, बाल धमाल, महिला साथी अशा अनेक उपक्रमांच्या माध्यमातून सामान्य नागरिकांसाठी किंबहुना सर्वस्तरातील व्यक्तींसाठी ते कार्यरत आहेत. चंदुलाल बियाणी यांनी मराठवाडा साहित्य परिषदेच्या माध्यमातून अध्यक्ष या नात्याने एक साहित्य चळवळ परळी शहरात राबविली आहे. मसापच्या वतीने होणारे मासिक काव्य संमेलन, साहित्यीकांसोबत संवाद, कोजागिरी तसेच दिवाळी निमित्त होणारे कविता वाचन आणि पहाटगाणी हे कार्यक्रम परळी शहराचे समीकरण ठरले आहे. मागील कालावधीत कोरोनामुळे सार्वजनिक कार्यक्रम होत नव्हते, परंतु चंदुलाल बियाणी यांनी आपल्या सहकार्यांच्यासोबत ऑनलाईन काव्य संमेलन सुद्धा भरविले होते. परळी शहरात शैक्षणिक दर्जा निर्माण होवून गुणवंत विद्यार्थी घडावेत यासाठी त्यांनी राजस्थानी चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून बचपन प्ले स्कुल, पोदार लर्न स्कुल आणि आता बन्सल क्लासेस परळीत सुरू केले आहेत. इंग्रजी माध्यमातून येथे मिळणारे शिक्षण अत्यंत दर्जदार असून गुणवंत विद्यार्थी घडवून घेण्यासाठी स्वतः चंदुलाल बियाणी व त्यांचे सर्व सहकारी सातत्याने कार्यरत असतात बन्सल क्लासेस परळीत तर आहेच आहे परंतू आता संपूर्ण बीड जिल्हयात आणि मराठवाडयात अनेक ठिकाणी सुरू झाले आहेत. केवळ दर्जदार शिक्षण नाही तर विज्ञान आणि तंत्रज्ञान शिक्षणासोबत रोजगारभिमूख शिक्षण देण्यासाठी, नवा उद्योजक तयार करण्यासाठी, प्रशासकिय अधिकारी तयार करण्याकरिता आवश्यक असलेले पायाभूत शिक्षण त्यांनी उपलब्ध करून दिले आहे. हेलिकॅप्टरद्वारे परळी शहरातील नागरिकांना अल्प दरात उपलब्ध करुन दिलेली परळी वैद्यनाथ दर्शन आकाशफेरी हा सुद्धा कौतुकास्पद विषय आहे. वास्तविक पाहता अशा प्रकारच्या हेलिकॅप्टरच्या फेऱ्या सहजपणे मिळत नाहीत हे लक्षात घेऊन त्यांनी नगर परिषदेतील काही निवडक सफाई कर्मचाऱ्यांना मोफत हेलिकॅप्टर रॅली उपलब्ध करुन दिलेली आहे. चंदुलाल बियाणी हे मारवाडी युवा मंचचे अध्यक्ष असून सोबतच विविध संस्थांशी त्यांचे अत्यंत निकटचे संबंध आहेत. जिथे म्हणून त्यांची गरज निर्माण झाली तेथे त्यांनी या संस्थांचे सोनेच केले आहे. राजस्थानी मल्टीस्टेट, पतसंस्था, सुयोग ॲक्वा, बचपन प्ले स्कुल, पोदार लर्न स्कुल, डीएफसी, मराठवाडा साथी, पीसीएन न्युज असे अनेक संस्था त्यांच्या माध्यमातून कार्यरत आहेत आरोग्य मित्र महाराष्ट्र प्रदेश या संस्थेचे ते अध्यक्ष असून मसाप या संस्थेचे सुद्धा ते अध्यक्ष आहेत. जिल्हा नियोजन समिती बीडचे ते सदस्य असून मराठवाडा व्यापारी संघाचे मराठवाडा विभागप्रमुख आहेत. जिथे म्हणून काम करता येईल त्या सर्व ठिकाणी चंदुलाल बियाणी यांनी मोठे काम उभे केले आहे.

# मोदींचे काँग्रेसवर टीकास्त्र

आधुनिक केसरी

राहुल गांधी यांची खासदारकी रद्द झाल्यानंतर त्यावरून भाजपा आणि काँग्रेस यांच्यात जोरदार राजकारण रंगले आहे. दोन्ही बाजूंनी आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. राहुल गांधींनी या निर्णयाविरोधात अपील करण्याचा निर्णयही जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर आज भाजपाच्या वर्धापन दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशभरातील भाजपा कार्यकर्ते-पदाधिकारी आणि नेतेमंडळींशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संवाद साधला. यावेळी त्यांनी काँग्रेसवर परखड शब्दांत टीका केली. तसेच, ब्रिटिशांनी जाताना जनतेला गुलाम बनवण्याची मानसिकता यांच्या मनात सोडली, असेही मोदी म्हणाले. हे सगळे लोक वंशवाद, परिवारवाद, जातीवाद, श्रेत्रवाद याचे बंधक झाले आहेत. भाजपाची राजकीय संस्कृती प्रत्येक देशवासीयाला सोबत घेऊन चालण्याची आहे. काँग्रेस आणि इतर पक्षांची संस्कृती छोटा विचार करायचा, छोटी स्वप्ने बघायची आणि त्याहून छोटं यश मिळवून आनंद साजरा करायचा, एकमेकांची पाठ थोपटायची अशी आहे. भाजपाची राजकीय संस्कृती मोठी स्वप्ने बघणे आणि त्याहून जास्त मिळवण्यासाठी जीवतोड मेहनत करणे ही आहे, असा टोला मोदींनी यावेळी लगावला. भारत स्वच्छ अभियान, शौचालय देण्याची घोषणा मी केली, तेव्हा हेच लोक काय काय बोलायचे. जेव्हा आपली मस्करी करण्यात ते यशस्वी झाले नाहीत, तेव्हा बादशाही मानसिकतेच्या या लोकांचा द्वेष अजून वाढला. त्यांनी कधी विचारच केला नव्हता की अनेक दशकांपासून हिंसेच्या समस्येने ग्रस्त जम्मू-काश्मीर आणि पूर्वेकडची राज्य शांततेत राहतील. कलम ३७० कधी हटेल असे त्यांना वाटले नव्हते. भाजपा जसं काम करतेय, ते यांना पचतच नाहीये. त्यामुळे या द्वेषातून ते आज खोट्यावर खोटे बोलत आहेत, अशा शब्गांत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेसवर टीका केली. भ्रष्टाचाराचा खुलासा होताना पाहून ते अस्वस्थ आणि हताश झाले आहेत. आता हे लोक इतके हताश, निराश झालेत की त्यांना एकच मार्ग दिसतोय. आता ते खुलेपणाने म्हणतायत की मोदी तेरी कबर खुदेगी. ते आता कबर खोदण्याची धमकी देतायत. बादशाही मानसिकतेच्या या लोकांना, पक्षांना एक गोष्ट माहिती नाहीये. आज देशातला गरीब, सामान्य माणूस, युवक, महिला, दलित, पीडित, वंचित, अदिवासी असे सगळे भाजपाचं कमळ फुलवण्यासाठी, त्याच्या संरक्षणासाठी ढाल बनून उभे राहिले आहेत", असे मोदी यावेळी म्हणाले. आपल्या अस्तित्वाची लढाई लढणाऱ्या या पक्षांकडून आपल्याविरोधात कट-कारस्थानं चालूच राहतील. पण आपण देशवासीयांच्या स्वप्नांना, आकांक्षांना दबले जाताना पाहू शकत नाही. त्यामुळे आपला जोर देशाच्या विकासावर आहे. देशवासीयांच्या कल्याणावर आहे, असे ते म्हणाले.

# रेल्वेचा प्रवास ठरतोय असुरक्षित!



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**अत्यंत विश्वासाचा आणि जिव्हाळ्याचा प्रवास म्हटला, तर रेल्वेकडे बघितले जाते. मात्र, काही घटनांमुळे रेल्वे सुरक्षेचा मुद्दा वारंवार उपस्थित केला जातो. धावत्या रेल्वेत वाढत चाललेली गुन्हेगारी, चोरी हा कळीचा मुद्दा होत आहे. एकेकाळी अत्यंत सुरक्षित प्रवास म्हणून मानला जाणारा रेल्वेप्रवास आता असुरक्षित वाटू लागला आहे. अलीकडे रेल्वे प्रवासा दरम्यान ज्या हिंसक घटना घडत आहे त्या अतिशय चिंताजनक असून रेल्वे प्रशासनाने या प्रश्नांकडे गांभीर्याने बघण्याची गरज परत एकदा निर्माण झाली आहे.**

गेल्या १७० वर्षात रेल्वेची सेवा प्रचंड बदलली आहे. मेट्रोसारखे आधुनिक प्रकल्प भारतात यशस्वी झाले आहेत. अनेक महानगरांमध्ये लोकल्स जाळं तयार झालं आहे. तरी रेल्वेतील सुरक्षेचा प्रश्न अजूनही ऐरणीवर आहे. आता भारतात नवीन बुलेट ट्रेन येऊ घातलीय पण यामुळे रेल्वेचे मुलभूत प्रश्न सुटणार आहेत का हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे रेल्वेचा प्रवास सुरक्षित व आरामदायी ठरण्या ऐवजी असुरक्षित व जीवघेणा ठरत आहे. रेल्वे प्रवासा दरम्यान ज्या लूटमारीच्या,चोरीच्या हाणामारीच्या घटना घडत आहे, त्यामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात येत आहे. केरळ मधील. मधेकोझिकोड जिल्ह्यातील इलाथूर येथील एका अज्ञात व्यक्तीने सहप्रवाशाच्या अंगावर पेट्रोल टाकून चालत्या ट्रेनमध्येच पेटवून दिल्याची खळबळजनक घटना नुकतीच घडली आहे. या घटनेत तीन जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. यात एका माय-लेकाचा समावेश आहे. एलाथुर येथील रेल्वे रुळांजवळ दोन मृतदेह सापडले असून या घटनेत आठ जण गंभीर जखमी आहेत. जखमींना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तर, आठपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. अलप्पुझा-कन्नूर मुख्य कार्यकारी एक्स्प्रेसच्या डी१ डब्ब्यात रात्री १०च्या सुमारास ही घटना घडली आहे.

तर दुसरीकडे झाशी येथील वीरांगना लक्ष्मीबाई रेल्वे स्टेशनवर लष्कराच्या दोन जवानांनी दोन महिलांवर बलात्कार केल्याची घटना घडली.

रेल्वे प्रवासात ज्या हिंसक घटना घडत आहे.त्यासाठी रेल्वे प्रशासन व नागरिक देखील तितकेच जबाबदार आहे.रेल्वेने दररोज लाखो प्रवाशी प्रवास करतात.मात्र प्रवासा दरम्यान रेल्वेचे नियम रेल्वे प्रशासन व प्रवाशी पाळतात काय? प्रवाशांच्या तुलनेत रेल्वे डब्बे कमी पडतात.त्यातच आता रेल्वेने वातानुकूलित डब्ब्यांची संख्या वाढवून शयनयान साधारण डब्ब्यांची व जनरल डब्ब्यांची संख्या कमी केल्याने जागे अभावी प्रवाशांची तारांबळ उडते.त्यातच शयनकोचमध्ये वेटींग तिकीट किती द्यावे,याचे नियम आहे,मात्र रेल्वे प्रशासन या नियमाचे पालन करत नाही. आरक्षित डब्ब्यात वेटींग तिकीट वाले व जनरलने प्रवास करणारे प्रवाशी प्रवास करतात. त्यामूळे याचा नाहक त्रास आरक्षित प्रवाशांना होतो.डब्ब्यात गर्दी होते. या गर्दीचा फायदा असामाजिक तत्वांकदून घेतला जातो.त्यातच रेल्वेत अवैध वेंडर्स,खाद्य पदार्थ विक्रेते, तृतीय पंथी आणि भिक्षेकरुंचा वावर वाढला आहे.पैसे न दिल्यास तृतीय पंथी प्रवाशांना मारहाण करतात. रेल्वे प्रवासातील ही बाब नित्याची झाली असून रेल्वे प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. आरक्षित डब्ब्यात प्रवास करताना अनारक्षित प्रवाशांना व विक्रेत्यांना रोखण्यात रेल्वे सुरक्षा बल व तिकीट कलेक्टर अपशशी ठरले आहेत.कारण यांच्याच आशीर्वादाने फुकटे प्रवाशी व चिरीमिरी देणारे प्रवास करतात.

फुकट्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढतं असल्याने रेल्वेचा प्रवास असुरक्षित झाला आहे.

रेल्वेत तिकीट न काढता प्रवास करणाऱ्यांची संख्या दिसेंदिवस वाढत आहे. या फुकट्या प्रवाशांवर कारवाई करण्यासाठी रेल्वेकडून वेळोवेळी मोहीम राबवली जाते. रेल्वेच्या या प्रयत्नांमुळे फुकट प्रवास करणाऱ्यांना चांगला दंड बसतो. परंतु त्यानंतरही या प्रवाशांची संख्या कमी होत नाही. यामुळे फुकट्या प्रवाशांकडून आरक्षित प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो.रेल्वेचे नियम नागरिकांनी पाळणे आवश्यक आहे.मात्र प्रवाशी रेल्वे नियम धाब्यावर बसून प्रवास करतात. २ कोटींहून अधिक प्रवासी दररोज रेल्वेने प्रवास करतात, त्यापैकी २०% म्हणजे सुमारे ४० लाख महिला प्रवास करतात. महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि रेल्वेमध्ये पाऊले उचलली तरी देखील महिलांवर अत्याचार होत आहे.कारण महिलांच्या राखीव डब्यातही पुरुष प्रवास करतात.

पुरूष प्रवाशी अढळल्यास रेल्वे ॲक्ट १६२ नुसार ५०० रूपये दंड आकारला जातो. संबंधित प्रवाशावर केस झाल्यास व प्रकरण न्यायालयात गेल्यास त्याला किमान एक हजार रूपये दंड ठोठावण्याची तरतूद आहे. संबंधितांकडे दंडाचे पैसे नसल्यास टीआरसी ( टील रायझींग ऑफ द कोर्ट ) अंतर्गत कारवाई केली जाते. काही प्रवासी मात्र टी.सी. ला मॅनेज करून यातून सही-सलामत आपली मुक्तता करून घेत असतातगर्दीचा व संधीचा फायदा घेवून काही असामाजिक तत्व याचा फायदा घेतात. परिणामतः याचा महिलांना त्रास सहन करावा लागतो.



# 'भारतरत्न'च्या तोडीचे शास्त्रज्ञ डॉ. शंकर आबाजी भिसे



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्यपूर्व काळातील थोर भारतीय संशोधक डॉ शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी. त्यांचा जन्म २९ एप्रिल १८६७ रोजी मुंबईत झाला. डॉ शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी असल्याने त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे तरीही त्यांचा विसर पडणाऱ्यांचीच संख्या यंदाही अधिक असेल. ज्या काळात भारतीय नागरिकांना कमी लेखले जात होते त्याकाळात डॉ भिसे यांनी संशोधनक्षेत्रात अजोड कार्य केले. लहानपणी एकदा भिसे साखर आणायला वाण्याकडे गेले. त्यावेळी वाण्याने लबाडी करून कमी वजनाची साखर दिल्याचं त्यांच्या लक्षात आलं. याबाबत त्यांनी व्यापाऱ्याला विचारलं असता " माझ्या काट्यावर विश्वास नसेल तर आपोआप वजन करणारं यंत्र शोधून काढ." असं वाण्याने त्यांना खोचकपणे म्हटलं.**



त्यावेळी एक दिवस तुला असे यंत्र देईन अस छोटा शंकर त्यांना आत्मविश्वासाने म्हणाला. लहानपणापासून संशोधनाची आवड असणाऱ्या डॉ भिसे यांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी दगडी कोळशापासून गॅस शुद्ध करण्याचे यंत्र बनवले. १८९७ मध्ये इन्व्हेंटर रिव्हीव अँड सायंटिफिक रेकॉर्ड या मासिकाने स्वयंमापन यंत्र करण्याची एक स्पर्धा जाहीर केली. स्वयंमापन यंत्र म्हणजे साखर, पीठ इत्यादी वस्तूंचे गिर्हाईकाला हवं तेवढं वजन करुन देणारं यंत्र. डॉ भिसे यांनी अशा यंत्राचा आराखडा तयार करून पाठवला. त्यांनी तयार केलेल्या वजन मापन यंत्राच्या आराखड्याला इंग्लंडमध्ये पहिले बक्षीस मिळाले. या स्पर्धेत युरोप आणि अमेरिकेतल्या नामांकित यंत्र शास्त्रज्ञांनी भाग घेतला होता हे विशेष. इंग्लंडमध्ये गेल्यावर त्यांनी छपाईच्या क्षेत्रात अनेक शोध लावले. १९०० साली डॉ भिसे यांचं लक्ष मुद्रण व्यवसायातील यंत्र सामग्रीकडे लागलं. त्या काळी प्रचलित असलेल्या लायनो, मोनो इत्यादी यंत्राची रचना आणि कालमर्यादा यांचा अभ्यास करुन त्यांनी भिसो टाईप या यंत्राचा शोध लावला व त्याचं प्रथम इंग्लंडमध्ये आणि नंतर अमेरिक, जर्मनी, फ्रांस या देशांमध्ये पेटंट घेतले. या यंत्राच्या उत्पादनासाठी सर रतनजी टाटा यांचे सहकार्य मिळवून द टाटा भिसे इन्व्हेशन ही कंपनी १९१० मध्ये लंडन येथे स्थापन केली. पण १९१५ मध्ये ती बंद पडली. त्याच सुमारास दर मिनिटाला साधारण बाराशे अक्षर छावणारं गुणीत मातृका हे यंत्र तयार केलं आणि १९१६ मध्ये विक्रीला आणलं. १९१६ साली भिसे अमेरिकेला गेले तिथे त्यांनी युनिव्हर्सल टाईप क्लस्टर हे यंत्र शोधून काढले आणि अमेरिकेत त्याचं पेटंट घेतले. याशिवाय मुद्रण व्यवसायातली आणखी अनेक यंत्रे त्यांनी तयार केली. डॉ भिसे यांनी शोध लावलेल्या ऑटोमेडियन या गुणकारी औषधामुळे पहिल्या महायुद्धात अनेक सैनिकांचे प्राण वाचले. डॉ भिसे यांच्या साठाव्या वाढदिवशी इंग्लंडमध्ये त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. या सुमारास त्यांची महान शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांच्याशी भेट झाली. एडिसन यांनीही त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला. डॉ भिसे इंग्लंडमध्ये असताना इंग्लंडचे आफ्रिकेशी युद्ध सुरू झाले. स्वयंचलित तोफा काढण्याची विनंती तेथील कारखानदारांनी डॉ भिसे यांना केली. त्यासाठी डॉ भिसे यांना त्यांनी खूप पैसे देऊ केले, पण आपले संशोधन हे विश्वाच्या कल्याणासाठी असून आपल्या संशोधनातून विश्वाचा संहार होऊ नये अशी त्यांची मानवतावादी भूमिका होती. म्हणूनच त्यांनी ही मागणी नम्रतापूर्वक नाकारली. डॉ भिसे यांनी सुमारे २०० शोध लावले. त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे ७ एप्रिल १९३५ रोजी या महान शास्त्रज्ञाचे निधन झाले. संशोधन क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. शासनाने त्यांच्या या महान कार्याची दखल घेऊन मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करावा.




हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# विद्यार्थ्यांनो जागृत व्हा : डॉ बाबासाहेब आंबेडकर



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300


आधुनिक केसरी

**डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखा सर्व गुण संपन्न, सच्चा राष्ट्रप्रेमी आणि अखिल मानवाचे कल्याण करण्याचा वसा घेणारे महापुरुष दुसरा होणे शक्य नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे प्रत्येक घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी होते. परंतु जातीव्यवस्थेने बरबटलेल्या आणि जातीची घाण आजही डोक्यातून न गेलेल्या लोकांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना एकाच जातीत बंद करण्याचा प्रयत्न केला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना जातीत बंद न करता त्यांचे विचार आत्मसात करून जर त्यांच्या विचारावरती अंमल झाला असता तर आज माणसाच्या वैयक्तिक प्रगती सोबतच देशाची प्रगती होऊन, देशातील नागरिक जागरूक झाला असता.**

जातीची घाण डोक्यात असल्यामुळे आणि जाती सोबत माती खाण्याची पूर्वीपासून चालत आलेली शिकवण डोक्यात असल्यामुळे वरच्या जातीतील लोकांच्या लाता सहन करण्याची मानसिकता असलेल्या लोकांनी खालच्या जातीतील लोकांच्या भाता ऐकणे पाप मानले जायचे. आणि म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा व विचाराचा प्रचार आणि प्रसार इथल्या सुशिक्षित लोकांनी केला नाही. स्वतःला हुशार समजणारे विद्यार्थ्यांनी सुद्धा बाबासाहेबांना वाचले नाही, समजून घेतले नाही, आजचा विद्यार्थी हा उद्याचा देशाचा एक जागृत नागरिक आणि देशातील व्यवस्था चालवणारा जबाबदार व्यक्ती म्हणून काम करत असतो. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विद्यार्थ्यां विषयी चे जर मत बघितलं तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला मदत होते. परंतु विद्यार्थ्यांनी सुद्धा बाबासाहेबांना वाचले नाही व समजून घेतले नाही. जो विद्यार्थी बाबासाहेबांना वाचत नाही किंवा समजून घेत नाही किंवा बाबासाहेबांचे वाचन फक्त गुण मिळाले म्हणून करत असेल तर त्यांना विद्यार्थी म्हणता येत नाही. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी विद्यार्थ्यांना जो संदेश दिला होता तो संदेश आजही जशाच्या तसा विद्यार्थ्यांना लागू होतो.



विद्यार्थ्यांनी व्यसन नशा इत्यादी पासून दूर राहून शरीर संपत्ती मजबूत ठेवावी. परंतु आजच आपण बघितले तर विद्यार्थी व्यसनामध्ये डुबलेले आहेत. अनेक प्रकारचे व्यसन त्यांना जडलेली आहेत. आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनावर परिणाम होत आहे. दुसरी आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट बाबासाहेबांनी विद्यार्थ्यांबद्दल मांडलेली आहे ती म्हणजे शिक्षण म्हणजे केवळ पदवीचा कागद देणारे नाही. पदवीधर असलेल्या व्यक्ती सुशिक्षित असतीलच असे नाही. थोडक्यात काय तर बाराखडी आणि एबीसीडी लिहिता वाचता येते म्हणजेच तो सुशिक्षित आहे असे मुळीच नाही. शिक्षणामुळे माणूस जागृत, तर्कवादी, बनतो जागृत आणि तर्कबादी बनलेल्या व्यक्तीला सत्य असत्य मधला फरक कळतो. समाजाचे हित कळते, देशाच्या हितासाठी कोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे याची जाणीव सुशिक्षित माणसाला असते. शिक्षित माणसांमुळे विषमतेची दरी कमी होते परंतु आजचा जर विचार केला तर परिस्थिती उलट आहे .दोन दोन तीन विषयांमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतलेले लोक सुद्धा जागृत व तर्कवादी नाहीत. सामाजिक समस्येच्या त्यांना जाणीव नाही. समाजामध्ये वावरताना सामाजिक समस्या निर्माण कशा होतात याची सुद्धा त्यांना माहिती नाही. तर अशा शिक्षणाचा विद्यार्थ्यांना व समाजाला कोणताही फायदा होत नाही. शिक्षण म्हणजे केवळ नोकरी करून पैसा कमावण्याचे साधन मुळीच नाही. तर शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होऊन समाजाच्या जडणघडनेमध्ये हातभार लागणे त्यालाच शिक्षण असे म्हणतात. परंतु हल्लीचे लोक शिक्षणाच्या माध्यमातून तर पैसा मिळवून स्वतःच्या घरापुरता विचार करतात. आणि म्हणूनच शिक्षणाचे महत्त्व कमी झालेले दिसते. विद्यार्थ्यांना समाजाच्या समस्या सोडा परंतु स्वतःच्या समस्या देखील माहिती नाही. याचे कारण शिक्षणाचा अर्थ केवळ डिग्री मिळवणे एवढाच मर्यादित केल्याने गफलत झालेली आहे. आजही कित्येक विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांच्या समस्या वरती तोडगा कसा करायचा त्याची तक्रार कुठे कोणाकडे आणि कशा पद्धतीने करायची याची सुद्धा माहिती नसते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षणाला खूप महत्त्व आहे. आणि म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मी आजन्म



विद्यार्थी आहे असे म्हणायचे. कारण शिक्षण फक्त शाळा महाविद्यालयामध्ये जाऊन मिळत नसते तर जीवनातील प्रत्येक अनुभवातून माणसाला अनेक गोष्टी शिकण्यासारख्या असतात. ज्याच्या माध्यमातून त्याचा फायदा स्वतःला व समाजाला होत असतो. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाला वाघिणीचे दूध असे म्हणायचे. आणि जो ही दूध प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असा ठाम विश्वास डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना होता. परंतु विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व न कळल्याने विद्यार्थी शिक्षण पूर्ण झाल्याच्या नंतरही गुरगुरने तर सोडा परंतु शिक्षणाच्या माध्यमातून साधा तोंडातून आवाजही येत नाही. अशी परिस्थिती विद्यार्थ्यांची झालेली आहे गुरगुरने म्हणजेच अन्याय अत्याचार सहन न करता सामाजिक समता व न्याय यासाठी जागृत असणे देशहिता प्रति इमानदार असने. परंतु शिक्षणाच्या माध्यमातून व्यवस्थेने जो काही विद्यार्थ्यांना गुलाम बनवण्याचा आज प्रयत्न केलेला आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून पैसा मिळवण्यासाठी नोकरी तर सोडा परंतु बोलता येत नाही असे मानसिक गुलाम बनवलेले आहे. जर डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार वाचले असते, अंगीकारले असते तर व्यवस्थेने शिक्षण प्रणालीमध्ये जेव्हा जेव्हा बदल घडवून आणले होते तेव्हा तेव्हा विद्यार्थ्यांनी आवाज उठवला असता. शिक्षणाच्या जोरावर ते गुरगुरले असते. परंतु शिक्षित झालेले विद्यार्थी स्वतःवर अन्याय अत्याचार होताना स्वस्त पडलेले दिसत आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या मते सुशिक्षित समाजामध्ये ज्ञान, विद्वत्ता व तर्क या गोष्टी विकसित होत असतात. आणि या विकसित झालेल्या गोष्टीचा वापर आपण कशा पद्धतीने करतो ते आपले विचारावरती अवलंबून असते. म्हणून त्यांनी शिक्षणाला दुधारी तलवार म्हटले होते. शिक्षण रुपी तलवारीला दोन धारा असतात. एक धार म्हणजे शिक्षणाच्या माध्यमातून जागृत होऊन समाजाच्या व देशाच्या हितासाठी निस्वार्थ भावनेतून लढणे. सर्वसामान्य जनतेचा, पिढीतांचा आवाज उठवून त्यांना न्याय देणे. आणि दुसरी धार असते ते ज्ञानाच्या, तर्काच्या जोरावर समाजाची फसवणूक करणे व स्वार्थ साधून घेणे. म्हणजे शिकलेला व्यक्ती समाजाचे कल्याण ही करू शकतो आणि समाजाचा नाश ही करू शकतो.

एवढी ताकद शिक्षणामध्ये आहे. परंतु आपण आजच जर विचार केला तर अनेक पदव्या मिळवलेल्या लोकांकडे विद्वत्तेचा ज्ञानाचा भाव दिसून येतो. अनेक पदव्या घेऊन सुद्धा जो व्यक्ती सुस्त पडलेला आहे, जो स्वतःच्या न्याय हक्कासाठी बोलण्याची तयारी दाखवत नाही, असा विद्यार्थी असा व्यक्ती समाजाचे काय भले करणार ? आणि समाजाचे काय वाईट करणार हा संशोधनाचा विषय आहे. कारण या व्यवस्थेने शिक्षणातुन गुणवत्ता काढून घेऊन शिक्षणाची तलवार बोथट करून टाकली आहे. परंतु सुशिक्षित लोकांनी सुस्त पडणे म्हणजे देशाला अधोगतीकडे नेने आहे. शिकलेले लोक सुस्त पडले आहेत म्हणून शिकलेल्या लोकांना अडाणी, पाखंडी व भोंदू लोक शिकलेला लोकांना मानसिक गुलाम बनवत आहेत. शिकलेल्या लोकांना शिक्षणाच्या समस्यांची जाणीव होऊ नाही म्हणून त्यांचं लक्ष दुसरीकडे नेत आहेत. म्हणजे ज्या सुशिक्षित विद्यार्थ्याने समाजाची बाजू घेऊन समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न करायला पाहिजे होता त्याच सुशिक्षित विद्यार्थ्याला नियंत्रित करण्याचे काम अडाणी पाखंडी व्यक्ती करत आहेत. आणि हा शिकलेला व्यक्ती ज्ञान,तर्क विद्वत्ता या गोष्टी गहाण टाकून अडाणी व पाखंडी भोंदू लोकांनी सांगितलेल्या काल्पनिक, तथ्येहीन गोष्टींवरती विश्वास ठेवून त्यांना भावनिक व धार्मिक बनवून त्यामध्येच गुरफटून पडलेला आहे. आणि त्यामुळेच समाजामध्ये सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत. पुढे जाऊन बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणतात विद्येला शिलाची जोड पाहिजेत. तरच त्या शिक्षणाला महत्त्व प्राप्त होते. परंतु आपण समाजाकडे डोळस वृत्तीने जर बघितले तर पाखंड, भोंदूगिरी च्या नावाखाली महिलांचे शोषण करतात आणि सुशिक्षित लोक शोषण करणाऱ्यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष धर्माचा आहे म्हणून समर्थन करतात ही अत्यंत नीच आणि बुद्धीला न पटणारी घटना जरी असली तरीही हे जगवण्याचे काम सुशिक्षित वर्गाकडूनच होते, हे नाकारता येत नाही.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी विद्यार्थ्यांना जागृत व्हा असे सांगताना महत्त्वपूर्ण गोष्टी अगोदर सांगून दिलेले होत्या. परंतु त्याची जाणीव विद्यार्थ्यांना नाही कारण त्याने बाबासाहेब आंबेडकर कधी वाचलेच नाहीत. व्यवस्था ही विद्यार्थ्यांना टिकू देणार नाही, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणार नाही, म्हणून विद्यार्थ्यांनी आपल्या विद्वत्तेच्या भरोशावरती स्वतःला सिद्ध करणे आवश्यक आहे. परंतु विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व न कळाल्याने विद्यार्थ्यांनी शिक्षणाला फक्त नोकरी मिळवण्याचे साधन समजल्याने मूळ शिक्षणाच्या उद्देशाकडे दुर्लक्ष झाले. आणि याचाच परिणाम म्हणून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे खाजगीकरण व शिकल्याच्या नंतर सर्वच नोकऱ्यांचे खाजगीकरण सरकारने करून विद्यार्थी व त्यांचे भविष्य अंधारात टाकलेले आहे. याची जाणीव अजूनही विद्यार्थ्यांना झालेली नाही आहे. म्हणजेच आज विद्यार्थ्यांना संविधानाच्या माध्यमातून शिक्षणाचा लाभ मिळाला परंतु विद्यार्थ्यांनी बाबासाहेब न स्वीकारल्यामुळे ते जागृत झाले नाहीत. आणि याचाच दुसरा परिणाम रोजगार महागाई आरोग्य सुविधा देशहित या गोष्टीशी विद्यार्थी व सुशिक्षित वर्गाने भावनिक व्हायला पाहिजे होते. परंतु तसे न होता अंधश्रद्धा पाखंड आणि भोंदूगिरी याविषयी लोक भावनीक व धार्मिक झालेत. आणि त्याचमुळे आजही विद्यार्थी हा जागृत झालेला नाही. परंतु बाबासाहेबांनी विद्यार्थ्यांना जो जागृत होण्याचा सल्ला दिला, तो स्विकारला तेव्हाच विद्यार्थी जागृत होईल. विद्यार्थ्यांना जागृत होण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार स्विकारून त्यांच्या विचारावर अंमल करणे आवश्यक आहे.

# सार्वजनिक आरोग्य आणीबाणी जाहीर कधी ?



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**डब्ल्यूएचओच्या व्यापक आदेशात सार्वभौमिक आरोग्य सल्ला, सार्वजनिक आरोग्याच्या जोखमीवर देखरेख, आरोग्य आपत्कालीन प्रतिक्रियांचे समन्वय, मानवी आरोग्य प्रसार यांचा समावेश आहे. डब्ल्यूएचओने सार्वजनिक आरोग्यासाठी केलेल्या अनेक कामांमध्ये प्रमुख भूमिका बजावली आहे, विशेषतः रोग निर्मूलन, पोलिओचे निर्मूलन आणि इबोला, कोरोना लसीचा विकास आदी. त्याच्या सद्य प्राधान्यांमध्ये संसर्गजन्य रोगांचा समावेश आहे, त्यात एचआयव्ही- एड्स, इबोला, मलेरिया आणि क्षयरोग यांची वर्णी लागते.**

डब्ल्यूएचओ सरकारी आरोग्य धोरणाला दोन उद्दीष्टांसह संबोधित करतो- पहिली गोष्ट म्हणजे, आरोग्य समानता वाढवणारी, गरीब-समर्थक, लिंग-प्रतिसाद देणारी आणि मानवी हक्कांवर आधारित दृष्टीकोन एकत्रित करणारी धोरणे, कार्यक्रमांद्वारे आरोग्याच्या मूलभूत सामाजिक आणि आर्थिक निर्धारकांना संबोधित करणे होय. तर दुसरे म्हणजे, आरोग्यदायी वातावरणाला चालना देणे, प्राथमिक प्रतिबंध तीव्र करणे आणि आरोग्यास होणाऱ्या पर्यावरणाच्या धोक्यांमागील मूळ कारणांवर लक्ष केंद्रित करणे यासाठी सर्व क्षेत्रातील सार्वजनिक धोरणांवर परिणाम करणे होय. डब्ल्यूएचओच्या तेरापैकी- ओळखल्या गेलेल्या पॉलिसी क्षेत्रांपैकी उर्वरित दोन डब्ल्यूएचओच्या भूमिकेशी संबंधित आहेत- जागतिक आरोग्य अजेंडा पुढे नेण्याच्या दृष्टीने डब्ल्यूएचओचे आदेश पार पाडण्यासाठी नेतृत्व, शासन, गती, भागीदारी व देश, संयुक्त राष्ट्र प्रणाली आणि इतर भागधारकांसह सहकार्य मजबूत करणे असते. डब्ल्यूएचओला एक लवचिक शिक्षण संस्था म्हणून विकसित करणे, टिकवून ठेवणे आणि त्याचे कार्य अधिक प्रभावीपणे पार पाडण्यास सक्षम करणे महत्त्वाचे आहे. विश्व स्वास्थ्य संस्था ही आंतरराष्ट्रीय सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात सुसंवादाचे कार्य करणारी संयुक्त राष्ट्रांची एक विशेष संस्था आहे. ती दि.७ एप्रिल १९४८ रोजी स्थापन झाली. स्वित्झर्लंडमधील जिनिव्हात मुख्यालय असणाऱ्या या संस्थेने एका अर्थी राष्ट्रसंघाचे एक उपांग असणाऱ्या आरोग्य संस्थेचे कार्य पुढे चालविले जात आहे.

आंतरराष्ट्रीय संघटना सन १९४५च्या संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेदरम्यान चीनच्या प्रतिनिधी स्झमिंग स्झे यांनी नॉर्वे ब्राझीलच्या प्रतिनिधींना नवीन संयुक्त राष्ट्रांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्था तयार करण्याचे काम दिले. या विषयावर ठराव मंजूर करण्यात अपयशी ठरल्यानंतर परिषदेचे सरचिटणीस अल्जर हिस यांनी अशी संघटना स्थापन करण्याच्या घोषणेचा वापर करण्याची शिफारस केली. स्झे आणि इतर प्रतिनिधींनी आरोग्याविषयी आंतरराष्ट्रीय परिषद बोलाविण्याची घोषणा केली. जागतिक आरोग्य संघटनेच्या घटनेवर संयुक्त राष्ट्रांच्या सर्व ५१ देशांनी आणि इतर १० देशांनी दि.२२ जुलै १९४६ रोजी स्वाक्षरी केली. अशाप्रकारे ही संयुक्त राष्ट्रांची पहिली विशेष संस्था बनली. त्याची स्थापना दि.७ एप्रिल १९४८ रोजी पहिल्या जागतिक आरोग्य दिनावर औपचारिकपणे अंमलात आणली. नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्कालीन परिस्थितीतील जागतिक आरोग्य संघटनेचे मुख्य उद्दीष्ट हे आहे, की जीवनाचे टाळण्यासारखे नुकसान, रोग आणि अपंगत्वाचे ओझे कमी करण्यासाठी देश आणि इतर भागधारकांशी




समन्वय साधणे. तब्बल १९४ सदस्य देशांच्या प्रतिनिधींनी बनलेल्या डब्ल्यूएचए एजन्सीची सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था म्हणून ती काम करते. ३४ आरोग्यतज्ञ कार्यकारी मंडळाची निवड करून त्यांना सल्ला देते. डब्ल्यूएचए अधिवेशन महासंचालक निवडणे, ध्येय, प्राधान्यक्रम, बजेट आणि क्रियाकलाप मंजूर करण्यास जबाबदार असतो. विद्यमान महासंचालक टेड्रोस अॅधानम, माजी आरोग्यमंत्री आणि इथिओपियाचे परराष्ट्रमंत्री यांनी दि.१ जुलै २०१७ रोजी पाच वर्षांचा कार्यकाळ सुरू केला. दि.२३ जून १८५१ रोजी आयोजित आंतरराष्ट्रीय स्वच्छता संमेलन, डब्ल्यूएचओचे पहिले पूर्ववर्ती होते. सन १८५१ ते १९३८ या काळात झालेल्या १४ परिषदांच्या आंतरराष्ट्रीय मालिका, आंतरराष्ट्रीय स्वच्छता संमेलने यांनी कॉलेरा, पिवळा ताप यांसारख्या अनेक रोगांचा सामना करण्याचे काम केले. संमेलन यशाच्या परिणामी, पॅन-अमेरिकन स्वच्छता विभागाने आणि आंतरराष्ट्रीय कार्यालय- डी स्वच्छता पब्लिक लवकरच स्थापन करण्यात आले. सन १९२० मध्ये लीग ऑफ नेशन्सची स्थापना झाली, तेव्हा त्यांनी आरोग्य संघटनेची स्थापना केली.

दि.५ मे २०१४ रोजी डब्ल्यूएचओने जाहीर केले, की पोलिओचा प्रसार हा जागतिक आरोग्य आणीबाणी आहे- आशिया, आफ्रिका आणि मध्य पूर्व या रोगांचा प्रादुर्भाव विलक्षण मानला गेला. दि.८ ऑगस्ट २०१४ रोजी डब्ल्यूएचओने जाहीर केले, की इबोलाचा प्रसार हा सार्वजनिक आरोग्य आणीबाणी आहे; ते गिनियामध्ये सुरू झाले. असा विश्वास होता, की हा उद्रेक जवळपासच्या इतर देशांमध्ये जसे की लाइबेरिया आणि सिएरा लिओनमध्ये पसरला होता.

दि.३० जानेवारी २०२० रोजी डब्ल्यूएचओने कोरोना- कोविड-१ हा साथरोग सर्व देशभर किंवा खंडभर असलेला सार्वजनिक आरोग्याची आणीबाणी म्हणून आंतरराष्ट्रीय चिंता जाहीर केली, हे येथे वाखाणण्याजोगेच म्हणावे लागेल!



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

# बहिणाई : संपादन अशोक चौधरी

आधुनिक केसरी

**बहिणाबाई चौधरी हे मराठी साहित्याला लाभलेल सर्वात सुंदर असं लेण आहे. आचार्य अत्रे यांच्या हाती सोपानदेव चौधरी यांनी आपल्या आईचा अस्सल बोलीभाषेतील शब्द ऐवज दिला आणि महाराष्ट्राला अस्सल बावनकशी सोन्याने मढवलेले शब्द वैभव कसे असते? ते पाहता आले. 24 ऑगस्ट 1980 मध्ये ज्माला आलेल्या आणि 3 डिसेंबर 1951 मध्ये निधन झालेल्या बहिणाबाई चौधरी या महाराष्ट्राला कवयित्री म्हणून परिचित झाल्या त्या त्यांच्या मृत्यूनंतर एका वर्षांनी, बोटावर मोजता यावी इतकी मर्यादित काव्यसंपदा असून फक्त महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशा विदेशातील मराठी कवितेच्या अभ्यासकाचा अभ्यास बहिणाबाईंच्या कवितांशिवाय पूर्ण होत नाही यातच बहिणाबाईंच्या कवितांचे मोठेपण दडलेले आहे.**

बहिणाबाई चौधरी यांनी आपल्या जीवनातील अनुभवाची शिदोरी निर्मळ मनाने शब्दरूपातून इतरांना वाटल्यामुळे ती शब्द शिदोरी तृप्तीचा ढेकर देणारी ठरली असे म्हणावे लागेल. सोपानदेव चौधरी हे स्वतः सुद्धा चांगले कवी होते मात्र त्यांनी स्वतःच्या कवितेकडे प्रसंगी दुर्लक्ष केले आणि आपल्या आईच्या शब्दांना महाराष्ट्रभर पोहोचविण्यासाठी प्रसारकाचे आणि प्रचारकाचे कार्य केले. सोपानदेव चौधरी नंतर बहिणाबाईंच्या काव्य विचाराचा वारसा प्रसारित करण्याचे काम अशोक चौधरी हे बहिणाबाई चौधरी मेमोरियल च्या माध्यमातून करत आहेत जळगाव खान्देश यांच्यावतीने सुरू आहे ही अतिशय सकारात्मक बाब आहे. अन्यथा काही मान्यवर साहित्यिकांचे चार पुस्तके त्यांच्या नातवाने सुद्धा वाचलेले नसतात अशा काळात आपल्या वंशातील कवयित्रीचा काव्य वारसा जपणे हे आपले कर्तव्य आहे असे समजून चालणाऱ्या चौधरी कुटुंबीयांचे महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने नक्कीच कौतुक करावे वाटते. अशोक निवृत्ती चौधरी यांनी बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्टसाठी बहिणाई हा अतिशय सुंदर असा ग्रंथसंपादित केला आहे. या ग्रंथात बहिणाबाई चौधरी यां चे व्यक्तिमत्व आणि कविता यांचा शब्द गौरव करणाऱ्या कविता आणि लेख यांचा समावेश आहे. बहिणाबाई चौधरी यांच्यावरील 62 कविता या संग्रहात आहेत तर त्यांच्या व्यक्तित्वाचा आणि कवित्वाचा परिचय करून देणारे 18 लेख या संग्रहात आहेत.

बहिणाई च्या पहिल्या भागातील 62 कवितांचा आढावा घेतला असता प्रज्ञा बागुल यांच्या कवितेतून

बहिणाबाईंच्या जीवन संघर्षाची ओळख आपल्याला होते. त्या म्हणतात

**पाय ठेवी निखाऱ्यात असा पेटला वणवा**
**नाही मिळाला आधार सौभाग्याचा तिचा जीवा**

बहिणाबाई चौधरी यांना वयाच्या साधारण तिसाव्या वर्षी वैधव्य आले आणि जवळपास सत्तर वर्षाच्या आयुष्यात त्यांनी 40 वर्ष एकटीने संसार गाडा ओढला. त्यांच्या आयुष्यातील हा संघर्ष प्रज्ञा बागुल यांनी नेमकेपणाने टिपला आहे. साहित्याचा मानसन्मान या कवितेमध्ये शरयू पामपट्टीवार यांनी बहिणाबाईंनी आपल्या कवितेत निसर्गाचा कसा आढावा घेतला आहे याबाबत विवेचन केले आहे. माणिक सुरजोशी, संध्या खैरनार, कल्याणी मादेशवार, कल्पना तुपे अशा अनेक कवयित्रींनी बहिणाबाई बद्दल जे लिखाण केले ते साधारण समांतर असल्याचे दिसून येते. 62 पैकी बहुतांश कवितांमध्ये बहिणाबाईंच्या अडाणीपणाचा उल्लेख करून त्यांचे शिक्षण नसले तरी त्यांचे तत्त्वज्ञान असामान्य होते असे साधारणपणे कवी लोकांनी आपल्या कवितेतून जाहीर केले आहे. खरे म्हणजे बहिणाबाईंचे चरित्र मुळातून जास्त कोणी अभ्यासले नसल्यामुळे या संग्रहातील बहुतांश कवितांचा सार जवळपास वरील प्रमाणे आहे.

मात्र अंजली नालमवार यांची मेवा जीवनकाव्याचा ही कविता वाचताना बहिणाबाईंचे कवित्व त्यांनी समजून घेतलेले आहे याचे समाधान मिळते. अरे संसार संसार, अरे खोप्यामध्ये खोपा, शेतकऱ्याचे सुखदुःख, जीवनातील चढ-उतार, ते अगदी आचार्य अत्रेपर्यंत त्यांची कविता जाण्यापर्यंतचा प्रवास कवयित्रीने आपल्या कवितेतून शब्दांकित केलेला दिसून येतो.

**मायच्या दुधाचे लेक पांग कसे फेडीतसे**
**तिच्या काव्याचा हो ठेवा जगापुढे आणितसे**

अशा शब्दातून ललिता घोडे यांनी बहिणाबाई चौधरींच्या कवितांना सोपानदेव चौधरी यांनी जगापुढे आणण्याचे जे कार्य केले त्याचा गौरव केलेला दिसून येतो. संग्रहात एकंदर अशा वेगळ्या बाबी फार अभावाने आढळतात. बहिणाबाई चौधरींना शब्दात बसवताना नाविन्याचा ओढ असून आपण काही वेगळे द्यायला पाहिजे ह्या जाणिवेतून लिखाण व्हायला हवे होते असे मला वाटते. बहिणाबाई चौधरी यांनी माझी माय सरस्वती असे म्हटले आणि तो धागा धरून बहुतांश कवीने त्यांना शारदेची आणि सरस्वतीची लेक म्हटले, त्यांच्या तत्त्वज्ञानाचा अनेकांनी उल्लेख केला मात्र ते तत्त्वज्ञान कोणते ते सांगण्याची कुणालाही गरज का वाटली नाही ? असा प्रश्न उभा राहत असतांना कुठेतरी प्रभावीपणे स्वप्ना पावडे यांच्या कवितेत

**अंधश्रद्धा भोंदूगिरी जीवनाचे अंतरंग**
**आई तुझ्या कवितेने सान थोर होई दंग**

असे वाचनात येते आणि बहिणाबाईंच्या नको नको रे ज्योतिषा सारख्या कवितेतून ज्योतिषशास्त्रासारख्या

थोतांडावर बहिणाबाईंचा विश्वास नव्हता त्यामुळे त्यांची कविता आणि व्यक्तिमत्व अंधश्रद्धा निर्मूलनाकडे धाव घेणारे होते याची आठवण येते. मात्र त्यांचे असे विविध काव्यात्मक आणि व्यक्तिमत्त्वाचे पैलू आपल्या कवितेतून वेगवेगळ्या कवींनी दाखवायला हवे होते, आणि खरे म्हणजे अशोक चौधरी यांनाही तेच अपेक्षित असेल हे नक्की, त्यांच्या अपेक्षा पूर्ण करणाऱ्या कवितांपैकी मंगला रोकडे यांची अहिराणी बोली भाषेतील मन्ही बहिणा ही कविता बहिणाबाईच्या यास स्मरणग्रंथासाठी पूरक आणि पोषक अशी आहे. या कवितेच्या शेवटी अहिराणी भाषेतील शब्दांसाठी प्रमाण भाषेतील समानार्थी शब्द देऊन कविता समजण्यास सोपी जावी यासाठी त्यांनी प्रयत्न केलेले दिसून येतात. अरुण पाटील यांच्या बहनाईची लेकरं आणि बहनाई चा पवाळा हे दोन्ही

बोली भाषेतील प्रयोग या ग्रंथाची उंची वाढवणारे आहेत असे म्हणावे वाटते. अहिरणी बोलीत बहिणाबाई वरचा पोवाडा ही तर फार विलक्षण आणि नाविन्यपूर्ण बाब अरुण पाटील यांनी वाचकांना दिली आहे. अशोक पारधे यांची चालत बोलत विद्यापीठ ही कविता सुद्धा तेवढीच प्रभावी आहे. खानदेश कन्या बहिणाबाई चौधरींचा पोवाडा हा प्रमाण भाषेतील शाहीर शिवाजीराव पाटील यांनी लिहिलेला पोवाडा एका अर्थाने मराठी भाषेतील साहित्यिकांचा गौरव करणारा प्रमाण भाषेतील पहिला पोवाडा असावा. कारण यापूर्वी पोवाडा हा इतिहासातील काही लढवय्या वीरांच्या शिवाय अगदी अपवादाने अण्णा भाऊ साठे यांच्या लेखणीतून स्टॅलीनग्रामचा किंवा एखाद्या शहराचा म्हणून समोर आला. मात्र साहित्यिक म्हणून आजपर्यंत

कोणावर पोवाडा माझ्या वाचनात नक्कीच आला नव्हता. या ठिकाणी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यावर पोवाडे रचले गेले आहेत आणि त्या दोघांचेही साहित्यिक कार्यही त्यांच्या सामाजिक कार्याच्या तोला मोलाचे असले तरी महात्मा फुले आणि सावित्रीबाई यांच्यावरील पोवाडे हे त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करणारे आहेत. मात्र बहिणाबाई चौधरी यांच्या निव्वळ साहित्यिका कार्याचा गौरव करणारा पोवाडा वेगळा म्हणूनच साहित्यिक म्हणून पहिला पोवाडा बहिणाबाई चौधरींवर तयार झाला आणि तो बहिणाई या गौरव ग्रंथात समाविष्ट आहे असे वाङ्मयीन इतिहासात नोंदले जाईल असे मला वाटते. बहिणाई या गौरव ग्रंथाच्या दुसऱ्या भागाचा विचार केला असता बहिणाबाई चौधरी यांच्या कार्याचा गौरव करणारे प्रभावी लेख वाचायला उपलब्ध झाले आहेत. यामध्ये प्रामुख्याने अशोक कोतवाल यांच्यासारख्या जेष्ठ साहित्यिकाचा बहिणाबाईंच्या कवितेतील काव्यमूल्य या बाबींवर भाष्य करणारा लेख बहिणाबाईंच्या कवितांचा संक्षिप्तपणे आढावा घेणारा आहे आहे. संतोष शंकरराव बारी आपल्या लेखात बहिणाबाईंची गाणी सोपान चौधरी आणि त्यांचा मावस भाऊ यांनी लिहून काढली असे म्हटले आहे यात सोपान देवांच्या मावस भावाचा गौरव त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांनी केला आहे मात्र तिच्या मावस भावाचे नाव येणे अपेक्षित होते. अस्मादिक म्हणजे मी स्वतः एक लेख या ग्रंथासाठी दिला आहे तो खरं म्हणजे माझ्या काव्य प्रदेशातील स्त्री या ग्रंथातील असून बहिणाबाई चौधरी यांच्यावर आणखी वेगळे काम करण्याची गरज मला स्वतः वाटते आणि मी ते लवकर

करीन बाकी मी माझ्या लेखा बद्दल काय बोलावे ? मात्र माझ्या लेखासारखाच बहिणाबाई चौधरी यांच्या काव्य विश्वातील स्त्री दर्शना घडविणारा डॉक्टर सविता पटेल यांचा अभ्यासपूर्ण लेख बहिणाबाई चौधरी यांच्या कालखंडातील स्त्रियांच्या जीवनशैलीवर आणि त्या जीवनशैलीचा बहिणाबाईंच्या कवितेमध्ये उमटलेला पडसाद यावर केलेले भाष्य वाचनीय आहे. भारती सावंत,मनीषा चौधरी, वीणा बाविस्कर, रोहिणी पांडे, नीलिमा नातू, डॉक्टर शैलजा करोडे, सतीश जैन प्राध्यापक गोपीचंद धनगर देवबा शिवाजी पाटील वैशाली मानकर इत्यादी सर्वांचे लेख अभ्यासपूर्ण मांडणीतून आले असून या लेखांमध्ये बहुतांश लेखकांनी बहिणाबाई चौधरींचे व्यक्तिमत्व आणि कविता आपापल्या पद्धतीने वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र काही लेखकांनी बहिणाबाईंच्या एका एका कवितेचे रसग्रहण करून त्या कवितांमध्ये बहिणाबाईंना काय

सांगायचे होते त्याबद्दल विवेचन करून त्या कवितेची आजच्या काळापर्यंत व्याप्ती कशी उरली आहे याबाबत भाष्य केले आहे. त्यामध्ये स्मिता प्रमोद पांडे यांनी माणूस या कवितेचे केलेले रसग्रहण, स्नेहल अवचट यांनी नको नको ज्योतिषा या




कवितेवर केलेले, बहिणाबाईंच्या मन या कवितेवर खूप जास्त बोलले आणि लिहिल्या गेले आहेत त्या कवितेवर निशा संजय डांगे यांचा लेखही छान झाला आहे. धरतीच्या कुशीमध्ये या कवितेवरील राजश्री भावार्थी यांचा लेख वाचनीय आहे. या सर्व रसग्रहणामध्ये लेखकांना बहिणाबाईंच्या कवितेवर भाष्य करत असताना स्वतःचे सृजन अधिक व्यापकपणे मांडता आले असते. वर्तमान काळातही बहिणा बाईंच्या कवितांचे औचित्य आणि महत्व यावर भाष्य करता आले असते मात्र अनेक लेखकांनी कवितेची ओळ आणि त्या ओळीचा शब्दशः अर्थ अशा पद्धतीचे रसग्रहण केलेले दिसून येते. या ठिकाणी वर्तमान पिढीतील लेखकांचा अभ्यास आणि व्यासंग कमी पडत आहे असे सांगावे वाटते. बहिणाबाई चौधरी यांच्या कविता जितक्या खोल आहेत, तितक्या खोलवर उतरून त्याचा सर्वांग सुंदर अर्थ शोधण्याचे काम वर्तमान पिढीतील लेखकांनी हातात घेतले पाहिजे, असे प्रकर्षाने नमूद करावे वाटते. या सर्व लेखांच्या तुलनेत महाराष्ट्रातील ख्यातनाम उद्योजक जैन इरिगेशन व बहिणाबाई चौधरी ट्रस्टचे अध्यक्ष अशोक जैन यांनी दिलेली प्रस्तावना बहिणाबाईंच्या कवितेप्रमाणे भावनिक पातळीवर संवेदना जागृत करणारी आणि मनाला मोहन टाकणारी आहे. अशोक जैन यांचे वाङ्मयीन भान साहित्याची जाण किती प्रगल्भ आहे तसेच त्यांचा बहिणाबाई चौधरींच्या साहित्य बद्दलचा आदर भाव किती आहे ? हे वेगळे सांगण्याची खरे म्हणजे गरज नाही. यांचे दोन शब्द आणि डॉक्टर मीनाक्षी पाटील यांची प्रस्तावना हा संग्रह वाचकांपर्यंत पोहोचण्या आधी अधिक सकारात्मकता पेरणारी आहे. युवराज माळी ह्या साहित्यावर नितांत प्रेम करणाऱ्या,

आणि दर्जेदार साहित्याचा ध्यास उरी बाळकणाऱ्या प्रकाशकाच्या संकल्पनेतून अथर्व पब्लिकेशन जळगाव खान्देश यांच्यामार्फत हा आकर्षक आणि सर्वांग सुंदर असा गौरव ग्रंथ निर्माण झाला आहे. विजय जैन यांचे रेखाचित्र आणि मुखपृष्ठ या निर्मितीचे मूल्य वाढवणारे आहे. बहिणाबाई चौधरी यांची मुखपृष्ठावरील प्रतिमा आणि बहिणाई या शब्दाची अक्षर रचना खूप सुंदर झाली आहे.

बहिणाबाई चौधरी ट्रस्ट चे अध्यक्ष अशोक जैन, तसेच अशोक चौधरी आणि इतर सर्व सदस्यांचे या सर्वांग सुंदर गौरव ग्रंथासाठी महाराष्ट्राच्या वतीने खूप खूप आभार आणि त्यांच्या पुढील कार्यासाठी खूप खूप शुभेच्छा!



पो.नि. जनार्दन शेवाळे
संपर्क : 8975023100

# वाहतूक नियम पाळा, नाहीतर दंड भरा

आधुनिक केसरी

**सध्या आपल्या सरकारने वाहतूक चलन (दंड) बऱ्याच प्रमाणात वाढवला आहे, हा दंड सामान्य नागरिकांना भरणे अशक्य आहे, त्यामुळे नागरिक आणि पोलिस यामध्ये वाद वाढत आहे, पण हा दंड सरकारने वाढवला आहे, पोलिसांनी नाही, हे नागरिकांनी लक्षात घेतले पाहिजे, म्हणजे पोलीस नागरिकांकडून वाहतूक नियम भंग झाले वर जो E-chalan मशीन द्वारे दंड आकारतात तो सरकार जमा होतो, आणि नागरिकांकडून वाहतूक नियम भंग झाला की दंड आकरण्याचे काम सरकारने पोलिसांना दिले आहे.**

एक तर वाहतूक नियम पाळा, नाहीतर दंड भरा, पण आपली चूक असताना पोलिसांशी वाद घालत बसू नका, त्या पोलिसांना दिवसभरात आपल्यासारख्या किती तरी नागरिकांना तोंड द्यावे लागते, त्यांना खूप त्रास सहन करावा लागतो, त्यासाठी आपल्याला दंड भरावा लागू नये याकरिता वाहतूक नियम पाळा.

1 ) आपल्याकडे ड्रायव्हिंग लायसन्स नसेल तर सर्वप्रथम काढून घ्या, त्याशिवाय गाडी चालवू नाका
2 ) टू व्हीलर वर जाताना गाडी चालवणाऱ्याने हेल्मेट घाला, आणि शक्य झाले तर गाडीमागे बसणाऱ्या व्यक्ती ला ही हेल्मेट घालायला सांगा
3 ) गाडी चालवताना आपल्या गाडीची कागदपत्रे तसेच ड्रायव्हिंग लायसन्स, सोबत बाळगा
4 ) गाडीचा इन्शुरन्स अद्ययावत ठेवा, संपला असेल तर पुन्हा अपडेट करून घ्या
5 ) आपली गाडी शकतो दुसऱ्या व्यक्तीला चालवण्यासाठी देऊ नका, आणि जर द्यावीच लागली तर त्याच्याकडे ड्रायव्हिंग लायसन्स आहे का ते चेक करा,
6 ) आपल्या टू व्हीलर वर तिसरा व्यक्ती बसवू नका.
7 ) आपली गाडी जर आपण एखाद्या व्यक्तीला विकली असेल किंवा विकत असाल तर ती गाडी त्या व्यक्तीने त्याच्या नावावर करून घेतली आहे का ते पहा, कारण जर ती गाडी तुमच्याच नावावर राहिली तर त्या गाडीवर पडणारा ऑनलाइन दंड आपल्या नावावर आपल्या घरच्या पत्यावर येणार,( वाहतूक कोर्ट चे पत्र आपल्या घरी येणार )
8 ) लहान मुलांना गाडी चालवण्यास देऊ नका, जोपर्यंत मुलगा ड्रायव्हिंग लायसन्स काढायच्या लायकीचा होत नाही, तोपर्यंत त्यास गाडी चालवण्यास देऊ नका,
9 ) गाडी चालवताना सिग्नल कटिंग करू नका, सिग्नल ला कॅमेरा असतो, आपल्या वाहनावर cctv कॅमेरा मार्फत दंड पडतो, आणि आपल्या गाडी नंबर वरून आपल्या घरच्या पत्यावर ( मोटार कोर्टाचे ) दंड आकारण्याबाबत पत्र येते,
10 ) सिग्नलला झेब्रा क्रॉसिंग वर वाहन थांबवू नका,
11 ) लाल सिग्नल लागते वेळी गाडीचा वेग वाढवू नाका, पिवळा सिग्नल लागताच गाडीचा वेग कमी करून गाडी थांबवा,
12 ) जवळचा रस्ता पडेल म्हणून उलट्या दिशेने ( wrong side ) ने वाहन नेवू नका,
13 ) गाडी नो पार्किंग एरिया किंवा फुटपाथवर पार्क करू नका, पार्किंग असलेल्या ठिकाणी गाडी पार्क करा.
14 ) गाडी चालवण्या आगोदर गाडीच्या टायर मधील हवा आणि पेट्रोल चेक करा, कमी असेल तर भरून घ्या,
15 ) वेळीच गाडीची सर्व्हिसिंग करून घ्या म्हणजे गाडी रस्त्यात कधी बंद पडू नये याची काळजी घ्या
16 ) जड वाहतूक दिलेल्या वेळेत आणि दिलेल्या रोड ने घेऊन जावा,
17 ) फोर व्हीलर, किंवा मोठी गाडी चालवताना नेहमी सीट बेल्ट



चा वापर करा
18 ) गाडीची नंबर प्लेट फॅन्सी असेल किंवा तुटलेली असेल तर ती बदलून टाका, व्यवस्थित मोठ्या अक्षरात गाडी नंबर दिसेल अशी नंबर प्लेट गाडी ला लावा.
19 ) खाजगी गाड्यावर पोलिस किंवा इतर काही मजकूर लिहू नका,
20 ) आपल्या वाहनाला दोन्ही बाजूला आरसे आसने गरजेचे आहे
21 ) आपल्या वाहनाला कर्कश्य हॉर्न बसवू नका
22 )फोर व्हीलर ला डार्क काळ्या काचा बसवू नका, गाडीमधील माणूस बाहेरच्या व्यक्तीला दिसेल अशी काच बसवावी
23 ) गाडीची फ्रंट लाईट आणि बॅक लाईट आणि पुढील व मागील इंडिकेटर बंद असेल किंवा तुटलेले असेल तर ते दुरुस्त करून घ्या.
24 ) गाडीवर किंवा गाडीमध्ये बसून राहून गाडी रस्त्यावर थांबवून मागून येणाऱ्या वाहतुकीस अडथळा निर्माण करू नका.

आपण जर वरील सर्व नियम आपल्या वाहनांच्या बाबतीत पाळत असाल तर आपल्या हातून कधीही वाहतुक नियमांचा भंग होणार नाही, आणि आपल्याला कोणताही दंड भरावा लागणार नाही, जर आपण कोणताही नियम मोडला तर वाहतूक पोलिसांना दोष देऊ नका, दंड भरा, आणि निघून जा आणि यावेळी दंडाची रक्कम सरकारने बऱ्याच प्रमाणात सरकारने वाढवली आहे, ती रक्कम सामन्य नागरिकाला भरणे कठीण वाटते, त्यामुळे आपण आपले वाहन योग्य रीतीने वापरा आणि चालवा. सर्व वाहन चालक यांनी आपले वाहन चालवताना काळजी घ्या.

# अंधारातील प्रश्नांना उजेडाची वाट दाखवणारा : 'उजेडाच्या वाटा'

आधुनिक केसरी

**उजेडाच्या वाटा' या लेखसंग्रहातून युवालेखक आशिष निनगुरकर यांनी समाजामधील ज्वलंत प्रश्नांवर प्रकाश टाकला आहे. सध्याच्या या आधुनिक व प्रगत समाजामध्ये अनेक समस्या असून अनेक गोष्टी काहीशा वेगळ्या आहेत. या पुस्तकांमधून लेखकाने अनेक समस्यांची जाणीव वाचकाला करून दिली आहे. यातील कित्येक प्रश्न असे आहेत की, ज्याची माहिती देखील आपणास नाही. असे असले तरी प्रश्नांची जाणीव करून देत असताना ती प्रश्न सोडवण्यासाठी उपाययोजना देखील सांगितले गेले आहेत. त्यामुळे हे पुस्तक केवळ लेखसंग्रह नसून सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी मार्गदर्शनपर पुस्तक आहे.**

सध्या बदलती जीवनशैली ही खूपच धावपळीची झाली आहे. अनेक लोकांना मानसिक शारीरिक आजार आहेत वयाच्या ५० - ६० च्या पुढे बी. पी व शुगरची गोळी सुरू होत असताना दिसत आहे. पूर्वीच्या काळामध्ये ५० - ६० वर्षाच्या पुढील वृद्धांना प्रश्न विचारला जायचा की शेतामध्ये जाता की नाही ? मात्र सध्या या प्रश्नाची जागा घेतली ती एका नवीन प्रश्नाने. तो प्रश्न म्हणजे बीपी शुगर वगैरे आहे काय? हे सगळं सांगतोय याचं कारण की सध्या अगदी तरुणांपासून ते वृद्धांपर्यंत कितीकांना शारीरिक व मानसिक स्वास्थ्य नाही याला राग हा घटक कारणीभूत आहे. म्हणजे रागावर नियंत्रण नसल्यामुळे अनेक मानसिक व शारीरिक समस्या निर्माण होतात यामुळेच आपले जीवन सुखी होण्याऐवजी त्रासदायक अधिक होत आहे. यासाठी प्रत्येकाने रागावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. लेखकाने या गोष्टी 'सुखी जगण्याचे एकच शास्त्र रागावर नियंत्रण हेच मुख्य अस्त्र' या लेखातून सुंदर मांडले आहे. जगामध्ये भारताचे नाव उज्वल करण्यासाठी आजच्या युवकांचे वर्तन कसे असावे यावर लेखकाने आपले मत व्यक्त करताना स्वामी विवेकानंदांचा दाखला दिला आहे. चेहऱ्यावर तेज, देहामध्ये शक्ती, मनामध्ये उत्साह, बुद्धीमध्ये विवेक, हृदयामध्ये करूणा, मातृभूमीवर प्रेम, इंद्रियांवर संयम, प्रबळ इच्छाशक्ती, धाडसाचे बळ, सिंहासारखी निर्भहीता, सेवेसाठी तत्परता हे गुण जाच्या अंगी आहेत तो आदर्श युवक ही संकल्पना स्वामी विवेकानंदांनी मांडली. पण आजचा युवक आव्हाने पेलण्यासाठी समर्थ आहे का ? मनगटात जगावर संक्रमण करण्यासाठी शक्ती आहे का ? हे प्रश्न लेखकाने उपस्थित करून युवक कसा असावा, त्याचे वर्तन कसे असावे ? यासाठी शिक्षण पद्धती कशी असावी ? सामाजिक परिस्थिती कशी असावी ? या बाबतीतले मार्गदर्शन या पुस्तकांमधून केले आहे.

अलिकडे सोशल मीडियाचा वापर देखील झपाट्याने होत असताना दिसत आहे. अनेक तरुण तरुणी, शालेय विद्यार्थी सोशल मीडियाचा वापर अगदी जलद गतीने करतात. सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेक आंदोलने, चळवळी चालवल्या जाऊ शकतात. म्हणजे सोशल मीडियाचा योग्य पद्धतीने वापर केल्यास सोशल मीडिया हा समाजामध्ये सकारात्मक भूमिका पार पाडू शकतो. मात्र कित्येक तरुण-तरुणी, विद्यार्थी या सोशल मीडियाचा चुकीचा वापर करताना दिसत आहेत. या बाबतीमध्ये सोशल मीडियाचा वापर सकारात्मक पद्धतीने कसा करावा हे देखील लेखकाने आवर्जून सांगितले आहे. या पुस्तकांमधून एकूण १५ लेख लेखकाने हाताळले आहेत. आजचा शिक्षक, सृजन पालकत्व, मराठी भाषेचा झेंडा अटकेपार न्या, आजच्या शिक्षणाची वास्तवता हे लेख वास्तव मांडणारे असून विचार करण्यास भाग पाडणार आहेत. हा लेख संग्रह अनेक प्रश्नांची नव्याने जाणीव करून देणारा आहे, तर कित्येक प्रश्नांना सोडवणारा देखील आहे. यातील प्रत्येक लेखाची भाषा ही सरळ व सोपी सहज समजण्यासारखी आहे. यामुळे वाचक हे पुस्तक वाचताना गुंतून राहील. सोबतच आपल्या वर्तनामध्ये परिवर्तन घडवेल हे मात्र नक्की.

या लेख संग्रहास डॉ. कैलास दौंड सर यांनी प्रस्तावना लिहिली आहे. ती प्रस्तावना देखील खूप बोलकी आहे. एकूणच पुस्तकाची रचना, बांधणी अप्रतिम आहे. हे पुस्तक तेजश्री प्रकाशन कबनुर यांनी प्रकाशित केले आहे. पुस्तकास अनुरूप व अतिशय बोलके मुखपृष्ठ




चित्रकार किशोर माणकापूरे यांनी बनवले आहे. सध्याचे गरजेचे व ज्वलंत विषय युवालेखक आशिष निनगुरकर यांनी हाताळले आहेत याबद्दल त्यांचे विशेष कौतुक आहे. हे पुस्तक येणाऱ्या काळामध्ये स्वतःची ओळख न्मिाण करेल अशी आशा आहे.

**किशोर माणकापुरे**
**(लेखक चित्रकार आहेत)**

**पुस्तकाचे नाव - उजेडाच्या वाटा**
**लेखक - आशिष निनगुरकर**
**पृष्ठे - १२०**
**किंमत - २०० रुपये**
**प्रकाशक - श्री. दादासाहेब जगदाळे, तेजश्री प्रकाशन**

# जलसंकटावर मात करण्याची गरज



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक जल विकास अहवालानुसार जगातील पाण्याची मागणी दरवर्षी जवळपास एक टक्क्याने वाढत असून पुढील दोन दशकांत ती आणखी वाढणार आहे. या अहवालानुसार विकसनशील आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्था असलेल्या देशांमध्ये पाण्याची मागणी झपाट्याने वाढणार आहे. शेतीपेक्षा औद्योगिक आणि घरगुती वापरासाठी पाण्याच्या मागणीला अधिक वेग येईल. जगभरातील अनेक शहरांना हवामान बदलामुळे पूर आणि दुष्काळासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. सध्या भारतातील अनेक शहरांमध्ये पाण्याचे भीषण संकट आहे. विशेष म्हणजे जलसंकटाचा सामना करणारी बहुतांश शहरे नद्यांच्या काठावर वसलेली आहेत.**

वास्तविक, येथील मोठ्या लोकसंख्येने या नद्यांच्या पाण्याचा अव्याहतपणे वापर केला आहे. अनेक पाण्याचे स्रोत सतत कोरडे होत आहेत. ज्या वेगाने जंगले नष्ट होत आहेत त्यापेक्षा तिप्पट वेगाने पाण्याचे स्रोत कोरडे होत असल्याचे संशोधनातून दिसून आले आहे. नीती आयोगाच्या 2018 च्या अहवालानुसार, देशातील अनेक शहरांमध्ये जलसंकट गंभीर स्वरूप धारण करत आहे. दिल्ली, बंगळुरू, चेन्नई, हैदराबाद आदी शहरांना या समस्येचा सर्वाधिक सामना करावा लागणार आहे. 2030 पर्यंत देशातील सुमारे चाळीस टक्के लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होणार नाही. येत्या अकरा वर्षांत देशातील साठ कोटींहून अधिक जनता पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागेल, अशी भीती व्यक्त होत आहे. जागतिक वन्यजीव निधी ( डब्लूडब्लुएफ ) च्या सर्वेक्षणात पुढील तीस वर्षांत जगातील 100 शहरांमध्ये पाण्याचे गंभीर संकट निर्माण होणार असल्याचे म्हटले आहे.



गेल्या दहा वर्षात भूजल पातळी 54 टक्क्यांनी घटली आहे. देशातील 55 टक्के विहिरी जवळपास कोरड्या पडल्या आहेत. वातावरणातील बदलामुळे आणि वाढत्या तापमानामुळे भविष्यात दुष्काळाची समस्या अधिक गडद होण्याची शक्यता आहे. तसे पाहिले तर आपल्या देशातील वार्षिक सरासरी पर्जन्यमान 1170 मिमी आहे, जे पश्चिम अमेरिकेपेक्षा जवळजवळ सहा पट जास्त आहे. असे असूनही, देशातील शहरी भागातील सुमारे 9 कोटी सत्तर लाख लोक पिण्याच्या स्वच्छ पाण्यापासून वंचित आहेत आणि ग्रामीण भागातील सुमारे 70 टक्के लोकांना प्रदूषित पाणी प्यावे लागते. देशातील सुमारे 33 कोटी लोक अशा ठिकाणी राहत आहेत जिथे दरवर्षी भीषण दुष्काळ पडतो. दुष्काळाला वैतागून शेतकरी आत्महत्या करत आहेत. देशात अनेक नद्या असल्या तरी त्यातील उपलब्ध पाण्याचा दर्जा मात्र खूपच खालावला आहे.

सध्या एकूण पाण्याच्या वापरापैकी 85 टक्के पाणी शेतीसाठी, 10 टक्के उद्योगांमध्ये आणि 5 टक्के घरांमध्ये वापरले जाते. 1994 मध्ये, देशात गोड्या पाण्याची दरडोई उपलब्धता सहा हजार घनमीटर होती. सन 2000 मध्ये ते प्रति व्यक्ती दोन हजार तीनशे घनमीटर इतके कमी करण्यात आले. 2025 पर्यंत, त्याची उपलब्धता प्रति व्यक्ती केवळ 1600 घनमीटरपर्यंत कमी होण्याची शक्यता आहे. देशातील पावसाच्या पाण्यापैकी पासष्ट टक्के पाणी समुद्रात वाहून जाते. गटारी- नाल्यांमध्ये दररोज चार लाख लिटर पाणी सोडले जाते. पण यापैकी फक्त 20 टक्केच पाणी पुन्हा वापरले जाते. देशभरात पडणाऱ्या एकूण पावसापैकी केवळ पाच टक्के पावसाचे पाणी संरक्षित केले, तरी वर्षभराची 100 कोटींहून अधिक लोकांची तहान भागू शकते. त्यासाठी स्थानिक पातळीवर भूजल व्यवस्थापन प्रकल्प उभारावे लागतील, त्यामुळे लोकांना त्यांच्या भागातील भूजलाच्या उपलब्धतेची माहिती मिळेल आणि ते त्याचा योग्य वापर करू शकतील. देशातील अनेक नद्या, तलाव आणि जलसाठे कोरडे पडले आहेत. त्यामुळे अनेक भागातील पाण्याची पातळी धोकादायक पातळीच्या



खाली गेली आहे. ज्या नद्यांवर धरणे बांधून पाण्याचा मुक्त प्रवाह बंद केला आहे, त्या नद्यांनाही धोका निर्माण झाला आहे.ज्या धरणाद्वारा पाणी अडवले जात आहे, त्या पाण्याचा औष्णिक वीज केंद्र, अणुऊर्जा केंद्रे आणि औद्योगिक युनिटसाठी जास्तीत जास्त वापर केला जात आहे. शेतकरी सिंचनासाठी खोल खोदलेल्या कूपनलिकेचा वापर करतात. घरगुती आणि औद्योगिक गरजांसाठीदेखील भूजल साठ्याचा वापर वाढला आहे. भूगर्भातील पाण्याचे योग्य पुनर्भरण होत नाही, उलट आधुनिक तंत्राच्या साहाय्याने जमिनीतील पाणी अक्षरशः शोषून काढले जात आहे. या अंदाधुंद पाणी पिळवणुकीचा परिणाम म्हणजे ज्या भागात दहा वर्षांपूर्वी 200 ते 300 फूट खोलीवर पाणी उपलब्ध होते, त्या भागात आता पाण्याची पातळी 700 ते 1000 फूट खोल गेली आहे. आणखी एक गंभीर बाब म्हणजे माणसे तलाव, नद्यांच्या जमिनीवर अतिक्रमण करू लागले आहेत. पाण्याचा अपव्यय थांबविण्यासाठी ठोस प्रयत्न केले जात तर नाहीतच. शिवाय उपलब्ध असलेले साफ व स्वच्छ पाणीदेखील हळूहळू प्रदूषित होत आहे. त्यामुळे जलसंधारण, पाण्याचा विवेकपूर्ण वापर, पाण्याचा पुनर्वापर आणि भूजल पुनर्भरण याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. युनोस्कोच्या जागतिक जल विकास अहवाल 2018 मध्ये असे नमूद केले आहे की भारत हा जगातील सर्वात जास्त भूजलाचा अतिशोषण करणारा देश आहे. खते आणि कीटकनाशकांच्या अतिवापरामुळेदेखील जलप्रदूषण वाढत आहे. पाण्याचे शुद्धीकरण करून ते पुनर्वापरासाठी योग्य बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यामध्ये नॅनो तंत्रज्ञानाचा वापर करता येईल. पावसाचे ८५ टक्के पाणी नद्यांमधून समुद्रात जाते. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि कृत्रिम पुनर्भरण तंत्र वापरण्याची गरज आहे. विहिरी व कूपनलिका यांची खोली निश्चित केली पाहिजे. एका मानकानुसार, विहिरी आणि कूपनलिका यांची खोली केवळ चारशे फूट म्हणजे एकशे वीस मीटरपर्यंत असायला हवी. कृषी क्षेत्राच्या सिंचनासाठी ठिबक आणि स्प्रिंकलर पद्धतीचा वापर वाढायला हवा. कृत्रिम पुनर्भरण तंत्राचा अवलंब करून डोंगराळ भागातील भूजल पातळी सुधारता येते. या तंत्राद्वारे वाया जात असलेल्या पाण्याची बचत करून ग्रामीण भागात भूजल पातळी वाढवता येऊ शकते. जलसंकट टाळण्यासाठी प्रभावी जलव्यवस्थापनासोबतच पाण्याचा गैरवापर रोखण्यासाठी गांभीर्याने पावले उचलण्याची गरज आहे. सरकारकडून होत असलेल्या प्रयत्नांबरोबरच सर्वसामान्यांनाही आपली जबाबदारी समजून घ्यावी लागेल, तरच आपण जलसंकटाला तोंड देऊ शकू. कृषी क्षेत्रातील पाण्याच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी, सिंचनाच्या आधुनिक पद्धतींचा अवलंब, पावसाच्या पाण्याचे संवर्धन आणि दूषित पाणी पुनर्वापर करण्यायोग्य करण्यासाठी योग्य प्रयत्न करावे लागतील. यासोबतच भूगर्भातील पाणी प्रदूषणापासून वाचवण्यासाठीही लक्ष द्यावे लागणार आहे. वॉटर हार्वेस्टिंगचे तंत्र आणि नवनवीन शोध याबरोबरच भारतातील पारंपरिक ज्ञान पद्धतीचाही आपण अवलंब केला पाहिजे. पूर्वी पावसाचे पाणी विहिरी, तलाव, सरोवर, पाझर तलाव इत्यादींमध्ये पुरेशा प्रमाणात साचत असे. ती परंपरा आपल्याला पुन्हा सुरू करावी लागेल, जेणेकरून जलाशयांमध्ये पुनर्भरण करून साठवता येईल. पावसावर आधारित शेती, नैसर्गिक शेतीसोबतच दुष्काळ प्रतिरोधक बियाणांच्या वापरालाही प्रोत्साहन द्यायला हवे. रसायने आणि कीटकनाशकांचा वापर कमीत कमी ठेवला पाहिजे, त्यामुळे जलप्रदूषण टाळता येईल. जलस्रोत जंतूमुक्त करण्यासाठीही व्यवस्था असायाला हवी. पाण्याचा पुनर्वापर करणेदेखील अत्यंत महत्त्वाचे आहे.

# उत्तम आरोग्य हिच सर्वोत्कृष्ट संपत्ती

आधुनिक केसरी

वारे माप संपत्ती खर्च करून देखील एकदा शरीर खचले तर पुन्हा हेच शरीर त्या पद्धतीने मिळवता येत नाही. मग आपले आरोग्य आपण उत्तमपणे सांभाळलं पाहिजे. आपल्या आरोग्य विषयी आपण फार गंभीर नाहीत हे तर सत्य आहे. आपण आपले आरोग्य न सांभाळता ते जास्तीत जास्त खिळखिळ कसे करता येईल हाच प्रयत्न करतो. जीवन विषयक नियमांच पालन केले तर उत्तम आरोग्य राहण्यासाठी काही बाधा येत नाही.उत्तम आरोग्य हिच सर्वोत्कृष्ट संपत्ती असुन देखील याच अनमोल संपत्ती कडे आपण कानाडोळा करत आहेत .आणि मग एकाएकी आरोग्य विषयक समस्या निर्माण झाल्या की मग मात्र आपण चिंतातूर होतो. मुळात योग्य वेळी योग्य दक्षता घेतली तर आरोग्य विषयक समस्या आपल्याला जास्त भेडसावणार नाहीत. आरोग्य हे अनमोल असे धन आहे. ज्याच्या समोर धन द्रव्य संपत्ती ही शुल्क आहे.पण आपण हिरे माणिक मोती सोडून कवड्या रेवडया वेचित बसलो आहेत. जगातील कोणत्याही प्रकारची संपती देऊन सुद्धा आरोग्य मिळत नाही. हे आपण जाणतो पण अनुकरण करताना गडबड होते. म्हणून आपण निरोगी राहण्यासाठी काहीच करत नाहीत. दैनंदिन जीवनातील बदलती जीवनशैली कमी होत चाललेले श्रम, प्रचंड मोठ्या प्रमाणात आहारात फास्ट फूडचा वापर, सेंद्रिय खाद्य पदार्थांऐवजी रासायनिक खाद्य पदार्थ युक्त अन्नाचा वाढता वापर, यामुळे वाढत चाललेल्या आरोग्य विषयक समस्या विद्यमान युगासाठी चिंतेची बाब आहे.आपले आजोबा पंजोबा यांचं वयोमान आणि आपल सध्याचे वयोमान विचार केला तर अध्यावर आपण पोहचलो आहोत. पन्नास साठ वर्षा अगोदर सर्व साधारण पणे वयोमान शंभर वर्षे होत म्हणजे बहुतांश लोक शंभर वर्ष पूर्ण करत आणि आज आपण पन्नास साठ वर आलोय. म्हणजे ही प्रगती आहे की अधोगती आहे. याच चिंतन आपण कधी करणार आहोत. ही अवस्था का निर्माण झाली आहे त्या काळी कोणत्याही प्रकारच्या आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध नसताना देखील वयोमान तितके जास्त होत. पण आज सगळीकडे आरोग्य सेवा सुविधा दिवसेंदिवस प्रगती होत असताना देखील आरोग्य बाबत विविध समस्या उद्‌भवत आहेत. आरोग्य हिच सध्याची सगळ्यात मोठी समस्या आहे. नियत वयोमान कमी होत आहे. महणून आरोग्य हे नेहमी उत्तम असले पाहिजे. जीवनशैली बदलत चालली आहे त्याचा थेट परिणाम आपल्या शरीरावर होऊन आपले आरोग्य धोक्यात येत आहे. शरिराला आवश्यक श्रम करण्यात आपण कमालीचा हलगर्जीपणा निष्काळजीपणा करत आहेत .जीवन जरी सहज मिळालेल असलं तरी ते अनमोल आहे याची जाणीव आपल्याला नसल्याने आपल्याला त्याच मुल्य नाही हि शोकांतिका आहे. शरीर नश्वर आहे, आत्मा अमर आहे, हे जरी सत्य असले तरी सुद्धा जीवन चालण्यासाठी अन्न पाणी हेच मुख्य घटक आहेत.

**-गणेश खाडे**

# ज्ञानोबा माऊलीच्या जयघोषात न्हाऊन निघाले तलवाडा

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**लोणी खुर्द :** टाळ -मृदुगाचा जयघोष, करत सादरीकरण, वारकऱ्यांच्या वेशभूषा परिधान केलेले बालक, डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन भजनात तल्लीन झालेल्या महिला या मंत्रमुग्ध करणाऱ्या वातावरणात करण्यात आलेला जयघोष... हे सर्व डोळ्याचे पारणे फेडणारे चित्र होते वैजापूर तालुक्यातीलतलवाडा नागवाडी येथील आखंड हरीनाम सप्ताहनिमित्त मोठ्या भक्तीभावात संपन्न होत आहे. गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली, या मिरवणुकीत आबाल वृद्ध सहभागी झाले होते.हनुमान मंदीररापासून या शोभयात्रेचा प्रारंभ करण्यात आला, दरम्यान तलवाडा येथील ग्रामस्थानी घरोघरी गुढी उभारल्या होत्या. डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन महिलांवर्ग देखील भक्तीनामात तल्लीन झाल्या होत्या तर स्थानिक लोकप्रतिनिधीनीही फुगडीवर ठेका धरला. युवक वर्गाने टाळ मृदंगाच्या बोलावर ताल धरत या मिरवणुकीत रंगत आणली. डोक्यावर कलश घेऊन मराठमोळ्या पेहरावात विद्यार्थिनी या शोभायात्रेत सहभागी झाल्या. फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली या मिरवणुकीत पंचक्रोशीतील भाविकांची उपस्थिती होती.





# रणजीत राजे भोसले लिखित "खान्देशी माणसं" पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** रणजीत राजे भोसले यांनी लिहलेल्या खान्देशी माणसं या कथासंग्रहाचे प्रकाशन शरद पवार यांच्या हस्ते मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे करण्यात आले. रणजीत राजे भोसले हे गेल्या 18 वर्षांपासून सामजिक, राजकीय क्षेत्रात सक्रीय काम करीत आहे. सध्या ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महानगर जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करीत असतांना देखील त्यांनी आपली लेखणाची आवड जोपासली आणि त्यातूनच त्यांनी आपल्या पाचव्या पुस्तकाचे प्रकाशन केले. यापूर्वी त्यांनी चार पुस्तकांचे लेखन केले आहे. त्यांनी आरोग्य मोड्युल (अहिराणी), आरोग्य मोड्युल (भिल्ल-मराठी), धुळे मानवी निर्देशांक पुस्तिका, स्वच्छता दूत आदी चार पुस्तकांचे लिखान केले आहे. खान्देशी माणसं हे कथासंग्रह त्यांचे पाचवे पुस्तक ह्या वर्षी प्रकाशित झाले आहे. खान्देशी माणसं हे कथासंग्रह असून यामध्ये पंधरा विविध व्यक्तीच्या जीवनावर लिखाण करण्यात आलेले आहे. खान्देशी माणसं पुस्तकामध्ये गावातील विविध जाती-धर्मातील लोक, त्यांचे एकमेकांशी असणारे संबंध, त्यांचे कष्ट, एकोपा, सहकार्य यांची माहिती दिली आहे. गावातील काही निस्वार्थी, प्रेमळ, कष्टाळू, मेहनती लोक, त्याचे दुःख, जीवनाची ओढाताण, जगण्याची धडपड, उदरनिर्वाहासाठीचे कष्ट यासर्व गोष्टींमुळे माणसाला जगण्याची प्रेरणा देतात. अशा व्यक्तीरुपांची ओळख या पुस्तकाद्वारे करुन देण्यात आली आहे. खान्देशी माणसं पुस्तकामध्ये खान्देशी खेड्यागावातील लोकांवर लिखाण केले आहे. गावातील चांगले, वाईट वातावरण, विविध जाती, धर्मातील लोक, त्यांचे एकमेकांशी असणारे संबंध, जीवनभरचे त्यांचे कष्ट, तसेच त्यांचे गावातील एकोप्याने आणि एकमेकांच्या सहकार्याने राहणे यांची माहिती यामध्ये दिली आहे. शेतकरी, बारा बलुतेदार यांच्यासह न्हावी, धोबी, सोनार, लोहार, मराठा, भिल्ल, दलित, भोई, मारवाडी, जैन, मुस्लिम हे सर्वजण गुण्यागोविंदाने कसे गावात राहतात. गावातील शेतकरी, मजुर, वंचित, बारा बलुतेदार, महिला कसे जीवन व्यतीत करतात. कथाच्या रुपांमध्ये दिलेली पात्रे ही सर्व खरी व सत्य आहेत. यामध्ये कुठलाही मिथ्थपणा नाही. गावात काम करणारा न्हावी, पाटील, मुस्लीम, चांभार, धोबी, मांग, भोई, किती इमानदारीने आपले काम करतात. हे सर्व ग्रामीण भागातील खेड्यातील खान्देशी माणसं आहेत. त्याच खान्देशातील गरिबाचे, कष्टकयांचे प्रतिबिंब या पुस्तकामध्ये रेखाटले आहेत. वाचकांनी सदर पुस्तक जरुर वाचावे असे आवाहन रंजीत राजे यांनी केले आहे.प्रकाशनावेळी शरद पवार यांनी रणजीत राजे भोसले यांचे कौतुक केले.

# धुळ्याहून लवकरच मनमाडमार्गे दादर रेल्वे

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सध्या सुरु असलेली मनमाड-दादर अमृतसर एक्सप्रेस लवकरच धुळे रेल्वे स्थानकातून सुटणार असून मनमाडमार्गे दादर असा तिचा प्रवास असणार आहे. आठवड्यातून तीन दिवस प्रायोगिक तत्त्वावर चाचणी घेतल्यानंतर ही रेल्वे रोज धुळेकरांच्या सेवेत राहील, अशी माहिती खा. डॉ. सुभाष भामरे यांनी दिली. करोना टाळेबंदीत बंद झालेली मुंबई बोगी आणि त्याचवेळी खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बससेवेचे वाढलेले प्रवासी भाडे यामुळे मुंबईला जा-ये करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय झाली होती. यामुळे प्रवाशांनी धुळे-मुंबई बोगीसाठी खासदार भामरे यांच्याकडे पाठपुरावा सुरू ठेवला होता. केवळ एक बोगी मिळविण्यापेक्षा भामरे यांनी स्वतंत्र रेल्वेचीच मागणी लावून धरली. धुळे-मनमाड-दादर अशी रेल्वे सुरू करण्यास रेल्वे मंडळाचा हिरवा कंदील मिळाला आहे. ही रेल्वे प्रायोगिक तत्वावर आठवड्यातून तीन दिवस आणि प्रतिसाद मिळू लागताच दररोज धावणार आहे. सकाळी साडेसहा वाजता धुळे स्थानकातून निघणारी ही गाडी दुपारी दीड वाजता मुंबईला पोहोचेल. मुंबईहून दुपारी साडेचार वाजता निघून रात्री ११ वाजता धुळ्याला पोहचेल. लवकरच ही रेल्वे सुरू होईल, असे खा. भामरे यांनी म्हटले आहे. धुळे ते मनमाड या मार्गावर अनेक तांत्रिक अडचणी असल्याने हा प्रश्न खितपत पडला होता. मुंबईला जाण्यासाठी असलेली धुळेकरांसाठीची एक बोगीही बंद झाली होती.

# शहानिशा करूनच गुन्हे दाखल करावेत : प्रतिभा शेलार

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** विनयभंग व बलात्काराचे गुन्हे दाखल करण्याआधी संपूर्ण घटनेचा तपास व शहानिशा करूनच गुन्हे दाखल करावे याबाबत एका निवेदनाद्वारे महालक्ष्मी आधार फाउंडेशनच्या संस्थापिका प्रतिभा शेलार यांनी म्हटले आहे. या प्रकरणी त्यांनी पोलिस प्रशासनास निवेदन दिले. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रात येत्या दोन वर्षात विनयभंग व बलात्काराच्या गुन्हे अति प्रमाणात दाखल होत आहेत.काही बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये महिला किंवा मुली या पुरुषाच्या किंवा मुलाच्या प्रेमात कित्येक वर्षापासून असतात व त्या कित्येक वर्षांमध्ये त्या मुलाबरोबर किंवा पुरुषाबरोबर सहमतीने या महिलेने किंवा त्या मुलीने शारीरिक संबंधकेलेले असतात काही कारणास्तव त्या पुरुष किंवा मुलगा आणि ती मुलगी किंवा महिला यांच्यामध्ये नातेसंबंध तुटले किंवा त्यांच्यात काही भांडण झालं तर त्या महिला किंवा मुली पोलीस स्टेशनमध्ये येऊन त्यांच्यावर जबरदस्तीने बलात्कार झाला किंवा विनयभंग झाला असे सांगतात त्याप्रमाणे पोलीस स्टेशनमध्ये बलात्कार किंवा विनयभंगाचे गुन्हे दाखल करतात. जर प्रेम संबंध व शारीरिक संबंध हे सहमतीने झाले असल्यास जबरदस्तीने बलात्कार व विनयभंगाचा गुन्हा कसा दाखल होतो. या विषयांवर थोडा विचार करण्यासारखी बाब आहे.हे विनयभंग व बलात्काराचे गुन्हे पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाल्यानंतर पीडित महिला किंवा मुलगी किंवा तिचे कुटुंब मेंबर बलात्कार किंवा विनयभंग केलेल्या पुरुष किंवा मुलाकडे पैशाची मागणी करतात.त्यामुळे बलात्कार किंवा विनयभंग अशा तक्रारी महिलेने किंवा मुलीने पोलीस स्टेशनला येऊन दाखल केल्या की पोलीस प्रशासनाने त्या तक्रारीचा तपास करावा, शहानिशा करावी आणि जर खरोखरच विनयभंग किंवा बलात्कार घडला असेल तरच गुन्हे दाखल करावे अन्यथा करू नये, असे प्रतिभा शेलार यांनी म्हटले आहे. काही घटनेमध्ये फसवणूक ही होत असते आणि काही लोकांना लुबाडण्याचेही त्या दृष्टीने हे कृत्य घडलेले असते, असे गुन्हे ज्या व्यक्तीवर दाखल झाल्याने त्या व्यक्तीचे किंवा पुरुषाचे किंवा मुलाचे आयुष्य बरबाद होते व तो पुरुष किंवा मुलगा समाजात सामान्यपणे वावरू शकत नाही. जर तो मुलगा अभ्यासू असेल आणि शिकत असेल तर मग काय त्या मुलाचं आयुष्य संपलं असे होते.त्याचबरोबर त्याची पूर्ण कुटुंबाला ही आपला समाज विकृत नजरेने पाहायला लागतो व त्या पुरुष किंवा मुलाला नोकरी शिक्षण सर्व ठिकाणी तुच्छ नजरेने पहात असतात. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात, शहरात, खेड्यात किंवा गावात अशा घटना घडत असतील तर पीडित महिलेची किंवा मुलीची तक्रार घेऊन त्याची पूर्णपणे शहानिशा करावी तपास करावा आणि जर त्यामध्ये खरोखरच बलात्कार किंवा विनयभंग घडला असेल तरच गुन्हे दाखल करावे अन्यथा करू नये, अशी विनंती प्रतिभा शेलार यांनी केली आहे.








# धुळ्यात सावरकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात भारतीय जनता पार्टी व शिवसेना शिंदे गट यांच्यातर्फे वीर सावरकर त्यांची प्रतिमा घेऊन मिरवणूक काढण्यात आली. भारतात सध्याचे राजकारण बघता काँग्रेस पार्टी तर्फे सावरकर यांचा वारंवार अपमान होत असल्याचा आरोप केला जात आहे त्यासाठी सावरकरांना सन्मान मिळावा म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गौरव यात्रा काढण्यासाठी आदेश केले आहे त्याच अनुषंगाने धुळे शहरात भारतीय जनता पार्टी व शिवसेना शिंदे गट एकत्र येऊन मी सावरकर नावाच्या टोप्या परिधान करून व त्यांच्या घोषणा देऊन मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीची सुरुवात श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली व सावरकर यांच्या पुतळ्याजवळ समारोप करण्यात आला. त्या ठिकाणी बीजेपी चे हिरामण गवळी यांनी काँग्रेसचे राहुल गांधी यांच्यावर अपशब्द वापरून टीका करण्यात आले. या ठिकाणी आमदार मंजुळा गावित, उपमहापौर नागसेन बोरसे, माजी सभापती सुनील बैसाणे, माझी महापौर प्रदीप कर्पे, मनोज मोरे, संजय वाल्हे, नगरसेवक प्रशांत बागुल, नगरसेवक अमोल मासुळे, हिरामण गवळी, सतीश महाले, विनोद थोरात आदी उपस्थित होते.

# सुधीर मुनगंटीवार यांचा सन्मान

## शब्दांकूर फाउंडेशनतर्फे भव्य सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**गोंडपिपरी :** गोंडपिपरी तालुक्यात कन्यका सभागृहात राज्याचे लोकप्रिय मंत्री ना.सुधीर भाऊ मुनगंटीवार (वन,मत्स्य व सांस्कृतिक मंत्री) यांचा सत्कार सोहळा व कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी तालुका भाजपा व वेगवेगळ्या गावातील कार्यकर्ते सन्मान करण्यासाठी उपस्थित होते.प्रथमतः स्वागत गीत,नृत्य व राज्यगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.गोंडपिपरी तालुक्यातील संस्था, सामाजिक संस्था पुन्हा एकदा कॅबिनेट मंत्रिपद मिळाल्यामुळे सत्कार करण्यास उपस्थित होते. शब्दांकूर फाउंडेशन ही नोंदणीकृत संस्था असून सामाजिक, शैक्षणिक,साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्राला वाहिलेली संस्था असून त्याद्वारे देखील सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर लोकनेते, विकासपुरुष सुधीरभाऊ मुनगंटीवार, माजी आमदार सुदर्शन निमकर, माजी अध्यक्ष जिल्हा परिषद तथा अध्यक्ष भाजपा (ग्रा.), माजी आमदार संजय धोटे,अमर बोडलावर माजी जि. प.सदस्य, अल्काताई आत्राम माजी जि.प. सदस्य, चेतनसिंह गौर,नामदेव डाहुले, शालिक माऊलीकर गटविकास अधिकारी, के.डी. मेश्राम तहसीलदार बबन निकोडे व इतर मान्यवर उपस्थित होते. सामान्य जनतेची नाळ पकडून समस्या सोडविण्यासाठी अग्रक्रम देणाऱ्या मंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार यांना सांस्कृतिक खाते मिळाले म्हणून शब्दांकूर फाउंडेशन तर्फे सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र व गुलाबपुष्प देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. सत्कार करतांना सल्लागार संतोष बांदूरकर, अध्यक्ष दुशांत निमकर, सचिव राजेश्वर अम्मावार,उज्ज्वल त्रिनगरीवार, देवानंद रामगिरकर,सचिन दळवी,अरुण कुत्तररमारे, गजानन बोबडे,मनोहर आंबोरकर इत्यादी शब्दांकूर फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते आणि शासकीय सैनिक स्कुल, चंद्रपूर ही सुधीरभाऊच्या स्वप्नातील अत्याधुनिक शाळा असून अवाढव्य फी कमी करण्याबाबत नि केंद्र-राज्य शासनाच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्याच्या संदर्भात पाठपुरावा करण्यासाठी देखील निवेदन देण्यात आले.





# कैलास विद्यालयात गटशिक्षण अधिकारी यांच्या हस्ते आधार कार्ड कॅम्पचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** पंचायत समिती खुलताबाद गटशिक्षणाधिकारी केवट यांच्या हस्ते आज दिनांक 5/4/2023 रोज बुधवार या दिवशी आधार अपडेट करण्याकरिता आधार अपडेट कॅम्प आयोजित करण्यात आला असून आपल्या खुलताबाद तालुक्यातील पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी यांच्या हस्ते कैलास विद्यालय बोडखा उद्घाटनप्रसंगी श्री केवट सर यांच्या हस्ते करण्यात आले आज दिवसभरातून 30 विद्यार्थी यांचे आधार कार्ड अपडेट केले यासाठी आमच्या शाळेतील सर्व वर्ग शिक्षकांनी सहकार्य करून सगळ्यांनी सहकार्य करून मदत केली यानंतर तीन ते चार दिवसात आपण परवानगी मागून जास्तीत जास्त शाळेतील विद्यार्थी एकही आधार कार्ड अपडेट केल्याशिवाय राहणार नाही हे सर्व शिक्षक वर्ग शिक्षकांनी सहकार्य करावे असे मुख्याध्यापक कैलास विद्यालय बोडखा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सगळ्यांनी सहकार्य करावे असे मुख्याध्यापक कैलास ससे मुख्याध्यापक यांच्यातर्फे श्री केवट सर साहेब पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांना सांगण्यात आले आणि मुख्याध्यापक कैलास ससे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ठोंबरे सर, शिरसाट सर, श्रीमती हरकल मॅडम, गोलार सर, क्षीरसागर सर मिरासे, परदेसी, सपकाळ, इतर सर्व विद्यार्थी पालक व पोलीस पाटील रायभान सोनवणे इतर गावकरी उपस्थित होते.

RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
ENTERPRISES
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com

# चिंचखेडा भवन येथे अखंड हरिनाम सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**चिंचखेडा :** अखंड हरिनाम सप्ताह चिंचखेडा भवन तालुका सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे चालू असलेल्या सप्ताहात चौथ्या दिवसाची किर्तन सेवा माझे परममित्र हभप भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज कुकलारे गदाना खुलताबाद यांची झाली पाचव्या दिवसाची किर्तन सेवा हभप सोमिनाथ महाराज खमाट ऊमारावती यांची झाली. प्रमुख उपस्थिती सप्ताहाचे मार्गदर्शक कैलास जी महाराज ढेपले पाथ्रीकर तालुका फुलंब्री जिल्हा संभाजीनगर अध्यक्ष निरंजन महाराज गिरी केराळा त्रिंबक महाराज काकडे धानोरा नामदेव महाराज आगळे पैठण सांरग महाराज हिवरडे खुलताबाद नाना म सोनवणे दत्ता माऊली तुपे वायरमन मुक्ताराम म गव्हांडे शिवाजी महाराज गव्हांडे नाकिरे मोढा तुकाराम पाटील कळम माणिक पाटील कळम साहेबराव पाटील कळम सोमिनाथ पाटील कळम कारखाना भवन व इतर गावकरी उपस्थित होते.



# साडेतीन लाख ग्राहकांनी वीजबिल भरले ऑनलाईन

## घरबसल्या वीजबिल भरण्याकडे वाढता कल

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** वीजबिलात मिळणारी सवलत आणि रांगेत उभे राहण्याचे कष्ट व वेळ वाचत असल्याने महावितरणच्या ग्राहकांकडून वीजबिल ऑनलाईन भरण्यास प्राधान्य मिळत आहे. गेल्या मार्च महिन्यात औरंगाबाद परिमंडलातील ३ लाख ५१ हजार ९५७ ग्राहकांनी ८४ कोटी ४ लाख रुपयांच्या वीजबिलांचा ऑनलाईन भरणा केला.

महावितरणने WWW.MAHADISCOM.IN या वेबसाईटवर ऑनलाईन बिल पेमेंट सुविधेसह मोबाईल ॲप उपलब्ध करून दिले आहे. सर्व लघुदाब ग्राहकांना चालू व मागील बिले पाहण्यासाठी व भरण्यासाठी नेट बँकिंग, क्रेडिट/डेबिट कार्डसह मोबाईल वॉलेट व कॅश कार्ड्सचा पर्याय उपलब्ध झाला आहे. त्यामुळे महावितरणच्या वेबसाईट व मोबाईल ॲपवरून वीजबिल भरण्यास ग्राहकांची पसंती वाढलेली आहे. महावितरणच्या वीजबिले ऑनलाईन भरण्याच्या आवाहनास ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे त्यांचे बिल भरणा केंद्रासमोरील



रांगेत उभे राहण्याचे कष्ट व वेळ वाचत आहे. औरंगाबाद शहर मंडलात १ लाख ७४ हजार ३८५ ग्राहकांनी ४५ कोटी ७३ लाख, औरंगाबाद ग्रामीण मंडलात १ लाख २५ हजार ३९ ग्राहकांनी २६ कोटी ६१ लाख तर जालना मंडलात ५२ हजार ५३३ ग्राहकांनी ११ कोटी ७० लाख रुपयांचे वीजबिल ऑनलाईन भरले आहे.

**बिलात ०.२५ टक्के सूट**

ग्राहकांना वीजबिलाचे ऑनलाईन पेमेंट सुलभतेने करता यावे व अशा ग्राहकांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी क्रेडिट कार्ड वगळता नेट बँकिंग, डिजिटल वॉलेट, कॅश कार्ड, डेबिट कार्ड व यूपीआय पद्धतीने वीजबिल भरल्यास महावितरणने ग्राहकांना ही सेवा निःशुल्क केली आहे. तसेच ऑनलाईन पेमेंट केल्यास वीजबिलात ५०० रुपयांच्या मर्यादेत ०.२५ टक्के सवलत मिळते. तात्काळ मिळते पोच वीजबिलाचे ऑनलाईन पेमेंट केल्यास ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर एसएमएसद्वारे त्वरित पोच मिळते. तसेच WWW.MAHADISCOM.IN या वेबसाईटवर 'पेमेंट हिस्ट्री' तपासल्यास वीजबिल भरणा तपशील व पावतीही उपलब्ध होते. त्यामुळे ऑनलाईन बिल भरण्याच्या सुविधेचा ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे.

**'गो-ग्रीन'द्वारे वर्षाला १२० रुपये वाचवा**

महावितरणने लघुदाब ग्राहकांना वीजबिल ऑनलाईन भरण्यासह ई-मेलद्वारे वीजबिल मिळविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तसेच छापील कागदाऐवजी 'गो-ग्रीन' संकल्पनेअंतर्गत वीजबिलाच्या फक्त ई-मेलचा पर्याय स्वीकारल्यास दरमहा १० रुपये सूट दिली जात आहे. तथापि, छापील कागदासह ई-मेलद्वारेही वीजबिल मिळविण्याची सोय उपलब्ध आहे. याबाबतची माहिती WWW.MAHADISCOM.IN या वेबसाईटवर उपलब्ध आहे.



# भाजपचा ४३वा वर्धापनदिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** भारतीय जनता पार्टीचा 43 वा वर्धापन दिन सांगोला तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने भाजप कार्यालय वाढेगाव नाका, सांगोला येथे मोठ्या उत्साहात प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थित साजरा करण्यात आला. यावेळी पक्षाच्या झेंड्याचे ध्वजारोहण करून भारतमाता,पंडित दीनदयाळ उपाध्याय, शामाप्रसाद मुखर्जी आदींच्या प्रतिमेचे पूजन तालुकाध्यक्ष चेतनसिंह(बाळासाहेब) केदार- सावंत यांचे हस्ते पुष्पहार घालून करण्यात आले. याप्रसंगी भाजपचे जेष्ठ कार्यकर्ते नागेश जोशी, वसंतराव सुपेकर , माजी सैनिक उत्तम चौगुले, कॅप्टन रावसाहेब साळुंखे, मेजर नरेश बाबर आदींचा सत्कार तालुकाध्यक्ष चेतनसिंह (बाळासाहेब) केदार - सावंत, माजी नगराध्यक्ष नवनाथ पवार, जिल्हा सचिव आनंद फाटे यांच्या हस्ते करण्यात आला.

भाजपचा आज स्थापना दिवस असल्याने गेल्या 43 वर्षात देशात व राज्यात पक्ष संघटन मजबूत करून देशातील व राज्यातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने कसोशीने प्रयत्न करून बलशाही राष्ट्र साकार करण्यासाठी विशेष प्रयत्न केल्याने भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना धन्यवाद देण्यात आला. यावेळी भाजपच्या वाढीसाठी मोलाचे योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांचाही गौरव करून त्यांचे विशेष आभार मानण्यात आले. तसेच भाजपचे विचार ध्येयधोरण सांगोला तालुका सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविणार असल्याची ग्वाही यावेळी बोलताना तालुका अध्यक्ष चेतनसिंह (बाळासाहेब) केदार - सावंत यांनी दिली.

या कार्यक्रमास भाजप किसान प्रदेश कार्यकारणी सदस्य शिवाजीराव गायकवाड,अनिल वाघमोडे,प्रवीण जानकर,संजय गव्हाणे, मानस कमलापुरकर, लक्ष्मीकांत लिगाडे, ओंकार कुलकर्णी,प्रसाद फुले,अमित पोरे, बाळासो चव्हाण, रोहित सावंत, विनोद उबाळे आदी कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिद्धार्थ मंडळाच्या वतीने एक हजाराहून अधिक आभा कार्डची नोंदणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आयुष्यमान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत लाभार्थी हे सामाजिक आर्थिक जातीय जनगणना 2011 आधारित विशिष्ठ निकषांनुसार निवडलेले ठराविक निवडक लाभार्थी कुटुंब असून याचा लाभ कमाल मर्यादा 5 लाख रुपये प्रती कुटुंब प्रती वर्ष घेता येणार आहे. धुळे शहरातील जास्त नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन सिध्दार्थ मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले होते. त्यानुसार दोन दिवसात हजाराहून अधिक लाभार्थ्यांची नावे नोंदवण्यात आली असून येत्या महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त 11 एप्रिल रोजी आयुष्यमान भारत कार्डचे वाटप करण्यात येणार आहे.

ज्या ज्या लाभार्थ्यांचे नोंदणी या ठिकाणी होणार आहे त्या लाभार्थ्यांना येणाऱ्या काळात आरोग्य योजनांचा मोफत लाभ होणार असल्याचे यावेळी सिध्दार्थ नवयुवक मित्र मंडळाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीचे अध्यक्ष पत्रकार नागिंद मोरे यांनी यावेळी सांगितले.

सदर योजने मुळे सर्वसामान्य ,गोर गरीब ,नागरिकाला 5 लाख रुपांपर्यंतच्या मोफत आरोग्य उपचार , तपासणी, शस्त्रक्रिया ही संपूर्ण देशातील सर्व शासकीय व पॅनल



वरती असलेल्या खासगी रुग्णालयात मोफत मिळणार आहे. आयुष्यमान भारत योजना काय आहे व तिचा नेमका उपयोग काय आहे या संदर्भात माहिती देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीचे उपाध्यक्ष ॲड. अरुण ढिवरे यांनी सांगितले की अचानक कुटुंबात आरोग्य समस्या निर्माण झाल्यावरती आर्थिक परिस्थिती नसेल तर अनेक व्यक्ती उपचार वीणा वंचित राहतात, आयुष्मान भारत योजने मुळे ही अडचण दूर होईल, त्यामुळे गोर गरीबांना या योजनेचा लाभ होणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

यावेळी उद्घाटन प्रसंगी देवपूर पोलीस ठाण्याचे पो.नि मोतीराम निकम साहेब, धुळे मनपाचे उपमहापौर नागसेन बोरसे, डॉ बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचे चेअरमन ॲड. महिंद्रा निळे, डॉ. संजय संघवी, शेखर कुलकर्णी, देवपूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पो.नि. सचिन बेंद्रे साहेब, वंचित आघाडीचे राज चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते डॉ. नागसेन बोरसे, प्राध्यापक वैशाली पाटील, विक्रांत साळवे, अविनाश थोरात, मुन्ना जपसरे, मुन्ना केसावलेकर, कन्हैया साखरे, प्रकाश अण्णा शिंदे, मोहन मोरे सर, गौतम पगारे, विवेक नेतकर, पंकज नेतकर, देवा थोरात, विजय शिंदे, सिध्दार्थ वाघ, मनोज कढरे, किशोर पाटील, विशाल मोरे, सिध्दार्थ मोरे, राज सोनवणे, राज ठाकुर विविध मान्यवर यावेळी उपस्थित झाले होते. यावेळी मंडळाचे मार्गदर्शन ॲड. विशाल साळवे यांनी या योजनेसंदर्भात मुख्य मार्गदर्शन करून कार्यक्रमाचा समारोप केला.





महाराष्ट्र Business Katta













# आईचा हातला पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कोल्हापूर येथील मराठी बालकुमार साहित्य सभा यांच्यावतीने उत्कृष्ठ व प्रतिष्ठेचा बालसाहित्य पुरस्कार यंदा प्रसिध्द बालकवी अय्युब पठाण लोहगांवकर यांचा बाल मनावर संस्कार करणारा व दर्जेदार बालकविता संग्रह, " आईचा हात" या बालकविता संग्रहाला बालसाहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. सदरील पुरस्काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, रोख रक्कम असे असून येत्या २८ एप्रीलला कोल्हापूर येथे मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. असे मराठी बालकुमार साहित्य सभेचे कार्यवाह परशराम आंबी, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत पाटील, अध्यक्ष चंद्रकांत निकाडे यांनी अय्युब पठाण यांना कळविले आहे.




# रोहिलागड जि. प. सर्कलसाठी दोन कोटी पंचवीस लाखांचे कामे मंजूर

## भिमराव पाटील डोंगरे यांच्या प्रयत्नाला यश

आधुनिक केसरी न्यूज

> अंबड तालुक्यातील पारनेर व रोहिलागड सर्कल मधील गावांसाठी रोहयो अंतर्गत केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री ना .रावसाहेब पाटील दानवे व आ .नारायण कुचे यांच्या सहकार्याने रोहयो मंत्री संदिपान भुमरे यांनी पारनेर तसेच रोहिलागड या दोन जिल्हा परिषद सर्कल मधील गावांसाठी गाव ,वस्ती अंतर्गत सिमेंट रस्ता व पेव्हर ब्लॉक बसवणे ही कामे मंजुर केली .यासाठी दोन कोटी पंचवीस लाख रुपयांचे हि कामे या गावांच्या विकासाला चालना देणार आहे .
>
> – भिमराव पाटील डोंगरे, माजी शिक्षण व आरोग्य सभापती जि .प .जालना .

**अंबड :** तालुक्यातील पारनेर व रोहिलागड जिल्हा परिषद सर्कलमधील विविध गावांत महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत 2 कोटी 25 लाखांचे कामे मंजूर करण्यात आली आहेत. यात गाव, वस्ती अंतर्गत सिमेंट रस्ता व पेव्हर ब्लॉक बसवणे या कामाचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्याचे रोहयो व फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांनी ही कामे मंजूर केली. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, बदनापूर -अंबड विधानसभा मतदारसंघाचे आ.नारायण कुचे यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने माजी शिक्षण व आरोग्य सभापती भिमराव पाटील डोंगरे आबा यांनी पुढाकार घेत पारनेर सर्कल मधील पारनेर, दुधपुरी, वाघलखेडा, हारतखेडा, काटखेडा, गोविंदपुर, धनगरपिंपरी, पानेगाव, बठाण खुर्द, मसई, मसई तांडा, सारंगपुर, नागझरी तर रोहिलागड सर्कल मधील किनगाववाडी, चिकनगाव, निहालसिंगवाडी, कौचलवाडी, शिराढोण, धनगरपिंपळगाव, कर्जत या गावात ही कामे मंजूर करुन आणली आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात कामे मंजूर झाल्याने या दोन्हीही जिल्हा परिषद सर्कल मधील गावांच्या विकासाला मोठा हातभार लागणार आहे.



# वैजापुरात हनुमान जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** बजरंगबली की जय,हनुमानजी की जय, सियावर रामचंद्र की जय, सब भगवंत की जय, पवनपुत्र हनुमान जी की जय अशा जय घोषात, फटाक्यांच्या आतिष बाजीत, भजन व हनुमान चालीसा पठण करीत हजारो भाविक भक्त यांनी गुरुवार( ता.०६ )सकाळी सव्वा सहा वाजता हनुमानजींची जयंती उत्साहात साजरी केली. महाप्रसंसद लाडू, तर काही ठिकाणी खिचडी, चना उसळ वाटून भक्त भविकांना महाप्रसाद प्रदान करण्यात आला. मुख्य कार्यक्रम श्री संकट मोचन हनुमान मंदिरात विश्वस्त व भक्त भाविक यांनी आरती केली. सर्वश्री प्रशांत कंगले, दशरथ बनकर, डॉ. नीलेश भाटिया, शिवलिंग साखरे, गोपाल शेठ, काशिनाथ भावसार, कैलास साखरे,सचिन उदावंत, केशव आंबेकर, धोंडीरामसिंह राजपूत, गणेश खैरे, काशिनाथशेठ गायकवाड, बाबासाहेब गायकवाड, विनोद गायकवाड, पी. जी.पवार, ॲड. मनोज दिवाकर यानी आरती केली. गुरुजी चंद्रकांत कुलकर्णी, प्रतीक कुलकर्णी, जगदीश अंकुश, चेतन कनगरकर यांनी पूजा पाठ केला. त्याचप्रमाणे शहरातील काटे मारुती मंदिर, परदेशी मढि मारोती मंदिर, ब्राह्मचारी मंदिर, पाटील गल्ली मारोती मंदिर, लाडवानी गल्ली मारोती मंदिर, लाडगाव रोड मंदिर येथे ही हनुमान जयंती उत्साहात साजरी होऊन भक्तांना प्रसाद वाटप करण्यात आले. महिला वर्ग सुमनबाई गायकवाड,अलका साखरे, जिजाबाई गायकवाड व असंख्य महिलांनी ही आरती केली. पोलीस पाटील गुलाबराव साळुंके, उत्तमराव साळुंके, बापू साळुंके, वसंतराव साळुंके, सुधीर लालसरे, महेश जाधव यांची उपस्थिती होती.

# खंडोबा यात्रा उत्सवनिमित्त विविध कार्यक्रम उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येळकोट, येळकोट, जय मल्हार, खंडोबा महाराज की जय, जय मल्हार,जय मल्हार अशा जयघोषात व पारंपरिक डफ,च्या वाद्य वाजवत, जागरण गोंधळतील सहकारी यांच्या गोंधळ गीतात येथील खंडोबानगर येथील खंडोबा मंदिरपासून श्री खंडोबा यांच्या प्रतिमेला रथात ठेऊन भव्य मिरवणूक सालाबादप्रमाणे याही वर्षी गुरुवार ( ता.०६ ) रोजी काढण्यात आली,सामाजिक कार्यकर्ते व स्वच्छता दूत धोंडीरामसिंह राजपूत यानी पालखी मिरवणुकीचा शुभारंभ श्रीफळ फोडून केला,त्यांनी शहर वाशीयांना खंडोबा प्रतिमा दर्शन घेऊन उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन केले,आ, रमेश पा. बोरनारे यानी आपल्या फंडातून या मंदिर परिसराला संरक्षक भिंत बांधून मंदिर सुशोभिकरणं केले. तसेच नगराध्यक्ष शिल्पाताई दिनेशभाऊ परदेशी उपनगराध्यक्ष साबेरखान यांनी या मंदिरास खूप सहाय्य केले याबद्दल त्यांचे आभार मानत धन्यवाद दिले, त्यांचा उत्सव समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला,पारंपरिक पिवळे फेटे,जागरण गोंधळ टीम, व डफ या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण होते. महिला ही फेटे बांधून सहभागी झाल्या होत्या. याप्रसंगी नगरसेवक डॉ,निलेश भाटिया, राजेंद्र पा. साळुंके, गणेश खैरे,बापू साळुंके,युवा सेना चे श्रीकांत साळुंके,बजरंग मगर,लताबाई मगर, शंकर मुळे, यांनी सहभाग नोंदविला, उत्सव समिती अध्यक्ष चंद्रकांत निकम, अशोक जेजुरकर, गणेश खंडागळे,अशोक जबादे,लक्ष्मण चन्ने, रामेश्वर भगत, शुभम जेजुरकर, कृष्णा जवादे, सचिन महाजन, अविनाश जेजुरकर यांनी परिश्रम घेतले. यानिमित्त १२गाड्याओढण्याचा कार्यक्रम ही झाला तसेच शोभेची दारू सोडण्यात आली, पारंपरिक जागरण गोंधळ कार्यक्रम होऊन महाप्रसाद वाटप ही करण्यात आले, चंद्रकांत निकम यांनी सर्वांना धन्यवाद दिले.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर




# पैठण येथे विर सावरकर गौरव यात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुका व शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने गुरुवारी सकाळी स्वतंत्र्यविर विनायक दामोधर सावरकर गौरव यात्रा काढण्यात आली. सावरकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून छत्रपती शिवाजी महाराज चौकातून जिल्हाध्यक्ष विजय औताडे यांच्या उपस्थितीत गौरव यात्रा मुख्य चौकातुन बसस्थानक मार्गे खंडोबा चौकात समारोप करण्यात आला. यावेळी भाजपाचे तालुकाअध्यक्ष डॉ. सुनील शिंदे, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुरज लोळगे, संघटन मंत्री लक्ष्मण औटे, महिला प्रदेशध्या उपाध्यक्ष रेखाताई कुलकर्णी, अश्विनी लखमले, शहराध्यक्ष शेखर पाटील, संतोष खराद, कैलास बरकसे, सिध्दार्थ परदेशी, ज्ञानेश्वर दहिवाळ, आतिष बारे, भाऊसाहेब बोरूडे, सुरेश गायकवाड, लक्ष्मीकांत पसारे, विजू ठाणगे, दीपक गव्हाणे,विजय अचारे आदी पदाधिकारी या गौरव यात्रेत सहभागी होते.

## जिंतुरात हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** येथे आज सकाळपासूनच सूर्योदयापूर्वीच ठिकठिकाणी हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव ची तयारी दिसत होती व त्याचबरोबर अनेक ठिकाणच्या हनुमान मंदिरात जन्मोत्सवासाठी भाविक भक्तांनी गर्दी केलेली दिसून येत होती सकाळी सूर्योदयापूर्वीच जिंतूर शहरातील वरूडवेस भागातील जागरण हनुमान मंदिर, शनी मंदिर, बलसा रोड येथील हनुमान मंदिर, पितळी हनुमान मंदिर, मोठा मारुती मंदिर, आदी भागांमध्ये भाविक भक्तांनी हनुमान जन्मोत्सवानिमित्त पूजा पाठ मंत्र उपचार करून अभिषेक करून मोठ्या उत्साहात जन्मोत्सव साजरा केला. यावेळी मोठ्या प्रमाणात भाविक भक्तांनी गर्दी केली होती यावेळी काही ठिकाणी पोलीस बंदोबस्त ही ठेवण्यात आला होता.

## मोबाईल चोरटा आमखेडा येथे जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील रामजीनगर आमखेडा ता सोयगाव येथे दि.०६/०२/२०२३ रोजी येथिल तक्रारदार यांचे तक्रारी जबाबावरुन अज्ञात आरोपीविरुध्द ९०००/- रुपये किंमतीचा ओपो कंपनीचा ए १५ मोबाईल हॅन्डसेट चोरी बाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता अशाच प्रकारचे काही गुन्हे घडलेले असल्याने मनीष कलवानिया, पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण, सुनील लांजेवार, अपर पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीणच डॉ. विजयकुमार मराठे, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग सिल्लोड यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्ह्यामध्ये सपोनि अनमोल केदार यांनी पोना १६३ बरडे, पोकों/१५४२ तायडे, पोकों/१५७१ रोकडे, पोकों / ६२० कोळी यांना आवश्यक सूचना दिल्या असता सदर तपास पथकाने गुप्तबातमीदार नेमले व पोलीस स्टॉफचे मदतीने मौजे आमखेडा येथे जावुन संशयीत असलेले इसम नामे १) वाळु हेमराज बेदवे, वय ३५ वर्षे रा. आमखेडा, ता. सोयगाव यास दि. ०३/०४/२०२३ रोजी ताब्यात घेवुन त्यांना गुन्ह्याचे अनुषंगाने चोरीस गेलेल्या मोबाईल हॅन्डसेट बाबत विचारपूस केली असता सदर आरोपीनी सदर गुन्ह्यातील मोबाईल हॅन्डसेट चोरी केली असल्याची कबुली दिली. सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेला ९०००/- रुपये किंमतीचा मोबाईल हॅन्डसेट आरोपीकडुन जप्त करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा अधिक पुढील तपास सपोनि अनमोल केदार यांचे मार्गदर्शनाने पोना बरडे हे करीत आहे.

## हनुमान जयंतीनिमित्त दक्षिणमुखी मंदिरात भाविकांची गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील दक्षिण मुखी हनुमान मंदिरात हनुमान जयंती निमित्त भाविकांची मोठी गर्दी झाली होती. गुरुवारी सकाळी पहाटेपासूनच भाविक वडोदबाजार येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात दर्शनासाठी गर्दी करताना दिसत होते पहाटे दक्षिणमुखी हनुमान मंदिरात अभिषेक आरती करण्यात आले यावेळी काही भाविकांनी पेढे वाटप केले हनुमान जयंती निमित्त दक्षिणमुखी हनुमान मंदिरात भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसत होती दक्षिण मुखी हनुमान मंदिरात पहाटे आरती अभिषेक करण्यात आला व फटाक्याच्या आतिशबाजी करण्यात आली होती. त्यामुळे मंदिर परिसरात तर मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आलेली होती त्यामुळे मंदिर परिसर रोषणाईने झगमग आतून दिसत होता हनुमान मंदिरात



भाविकांनी आरतीसाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी वडोद बाजारचे उपसरपंच गोपाळ वाघ किशोर पाटील सुनील तांबट दत्तू वाघ आजिनाथ वाघ आकाश पांडेजी, वर्षभ पांडेजी, काकासाहेब वाघ पांडुरंग मस्के अभिषेक शिनगारे गोविंद पांडे जी सुनील दारकोंडे धर्मेंद्र पाटणी सारंग वाघ लक्ष्मण वाघ कमलेश वायकोस नितीन कथार नितीन सदावर्ते जनार्दन मस्के मधुकर मस्के बाळू वाघ उमाजी साने ,काळू म्हस्के रमेश धनके सचिन राऊत भागिनाथ घुले संदीप वाघ पांडुरंग वाघ आधी सहभागी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागपूर- भंडारा मार्गावर शिवशाही बसला आग

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** नागपूर- अमरावती मार्गावर ४ एप्रिलला एसटी महामंडळाच्या एका शिवशाही बसला आग लागल्याची घटना ताजी असतांनाच गुरूवारी सकाळी नागपूर- भंडारा महामार्गावरही एका शिवशाही बसला आग लागली. वेळीच प्रवासी बसमधून उतरल्याने अनुचित प्रकार टळला. नागपुरच्या घाट रोड आगारातील शिवशाही बस क्रमांक एमएच- ०९, ईएम- १२९३ ही नेहमीप्रमाणे नागपूरहून भंडारासाठी गुरूवारी निघाली. मौदा रोडवर सकाळी ९ वाजताच्या दरम्यान अचानक बसच्या सायलेंसरच्या भागातून धूर निघू लागला. हा प्रकार बसच्या चालक- वाहकाच्या निदर्शनात आल्याने तातडीने बस थांबवून प्रवाश्यांना खाली उतरवण्यात आले. बसमध्ये सुमारे ३८ प्रवासी होते. दरम्यान एसटीच्या कर्मचाऱ्यांनी बसमधील अग्निशमन यंत्राच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवले. त्यानंतर दुसऱ्या बसने प्रवाश्यांना पुढच्या प्रवासासाठी पाठवले गेले. यासंदर्भात एसटी महामंडळातील नागपूर विभाग नियंत्रक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी सांगितले की, सायलंसरला रबरचा स्पर्श झाला. त्यामुळे रबरने पेट घेतल्याने धूर निघाला. परंतु वेळीच आगीवर नियंत्रण मिळवले असून काहीही अनुचित घडले नसून बसलाही नुकसान झाला नसल्याचा दावा केला.



## पोनि भरत मोरे यांची सोशल मीडियावर करडी नजर

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर पोलिस स्टेशनचे पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत मोरे यांची सोशल मीडियावर करडी नजर सोशल मीडियावर द्वेषपूर्ण धार्मिक मेसेज पोस्ट करता? सावधान... पोलिसांची पोलिसांची नजर, पोलीस चौकी पोलिस अधिकारी फरदापुर पोलीस अधिकारी फरदापुर हद्दीतील नांदगाव,डाभा, टिटवी,देव्हारी,मोलखेडा,घाणेगांव तांडा परिसरातील नागरिकांनी सुजाण व सूचित वारी की, आपल्या मोबाइल व्हाट्सअप ग्रुप सह फेसबुक, फेसबुकवर पोलीस अधिकारी फरदापुर पोलीसांची नजर असून, आपल्या मोबाईल मध्ये कोणाही समाज, पंत, वंश व धर्माच्या धार्मिक भावना दोन समाजवादी धार्मिक तेढ निर्माण करण्याची माहिती सामाजिक मीडियावर फॉरवर्ड करू याची सर्वांनी नोंद केली पाहिजे.जाती धर्माच्या भावना दुखावण्याची गैर केली जाणार नाही असे कोणतेही व्यक्तीने केल्यास त्वरित आमच्याशी संपर्क साधावा सपोनि भरत मोरे पोलीस निरिक्षक( मो.9689772727 ), आनंद पगारे ( 9370711998 ) व निलेश लोखंडे गोपनीय शाखा( 918530361598 ), फर्दापूर पोलिस स्टेशन यांनी अशे आवाहन केले आहे.



# लोकसभेच्या सर्व जागा जिंकण्याचा संकल्प करा

## भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे पक्ष कार्यकर्त्यांना आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजपा-शिवसेना युतीसह सर्वच्या सर्व ४८ जागा जिंकण्याचा आणि विधानसभा निवडणुकीत २०० पेक्षा अधिक जागा मिळवण्याचा संकल्प करा, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी केले. भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनानिमित्त भाजपा प्रदेश कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बावनकुळे बोलत होते. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल राम नाईक, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कामगार मंत्री सुरेश खाडे, प्रदेश उपाध्यक्ष सुनील कर्जतकर, चित्रा वाघ, राज पुरोहित, कृपाशंकर सिंग, प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये आदी यावेळी उपस्थित होते.

बावनकुळे म्हणाले की,अत्यंत प्रतिकूल काळात हजारो कार्यकर्त्यांनी जनसंघ आणि त्यानंतर भाजपा ची विचारधारा रुजविण्यासाठी प्रयत्न केले. या कार्यकर्त्यांनी केलेल्या त्यागावरच आज पक्ष उभा आहे. भारतीय जनता पार्टीची स्थापना करताना अटलबिहारी वाजपेयी यांनी समृद्ध, विकसित, बलशाली भारताचे स्वप्न पाहिले होते. नरेंद्र मोदी यांनी अटलजींनी पाहिलेले सर्वश्रेष्ठ भारताचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने पावले टाकली आहेत. त्यामुळेच भारत हा जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेला देश बनला आहे.

यापुढील काळात राज्यात पक्ष वाढविण्यासाठी कार्यकर्त्यांनी पक्षाने दिलेल्या विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करून मोदी सरकार आणि राज्यातील शिंदे - फडणवीस सरकारची विकास कामे सर्वसामान्य माणसापर्यंत पोहचविली पाहिजेत. ३ कोटी नवे सदस्य बनविण्याचे अभियान यशस्वी करण्याचा आणि शिवसेना युतीसह लोकसभेच्या सर्व ४८ जागा, विधानसभेच्या २०० पेक्षा अधिक जागा जिंकण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी स्थापना दिनाच्या निमित्ताने केला पाहिजे, असेही श्री. बावनकुळे यांनी नमूद केले.

यावेळी बावनकुळे यांच्या हस्ते जनसंघापासून काम केलेल्या राम नाईक, मुकुंदराव कुलकर्णी, मधू चव्हाण, कांताताई नलावडे, दिलीप गोडांबे, कर्नल चौधरी, कर्नल देशपांडे, अनंत मराठे, शैला पतंगे - सामंत, दिलीप हजारे, भरत कारंडे, श्रीपाद मुसळे,




बाबा कुलकर्णी आदी ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. त्याआधी बावनकुळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पक्षाच्या आयुष्मान भारत सेल तर्फे आयोजित आयुष्मान भारत कार्ड वितरण कार्यक्रमाचा प्रारंभही बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आला.

# वैजापूरच्या खासगी 'कृऊबा'मध्ये लुटण्याचा 'शुभारंभ'

## हीच हक्काची बाजारपेठ आहे काय? संतप्त शेतकऱ्यांचा सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल त्रिभुवन**

**वैजापूर :** 'शेतकऱ्यांच्या हक्काची व विश्वासाची बाजारपेठ' अशी 'टिमकी' मिरवणाऱ्या येथील खासगी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कांदा लिलावात शेतकऱ्यांचा शुभारंभाच्या पहिल्याच दिवशी भ्रमनिरास झाला. व्यापाऱ्यांनी कांदा लिलावात बेभाव बोली सुरू केल्याने संतापलेल्या शेतकऱ्यांनी गोंधळ घालून लिलाव बंद पाडला. काही शेतकऱ्यांनी कांद्याची वाहने माघारी नेली. हा कांदा खरेदीचा शुभारंभ नसून या बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना लुटण्याचा 'शुभारंभ' करण्यात आल्याच्या संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत आहे.

शासनाने कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी अनुदान जाहीर केल्यानंतर 29 व मार्च रोजी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कांदा लिलावात शेतकऱ्यांची कशी 'शिकार' केली. हे येथे वेगळे अधोरेखित करण्याची गरज नाही. त्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समितीने 8 एप्रिलपर्यंत कांदा बाजार बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. हीच संधी साधून वैजापूर - गंगापूर राज्य महामार्गावरील नव्याने उदयास आलेल्या खासगी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा खरेदीचा शुभारंभ करण्यात आला.

**शेतकऱ्यास टोपी अन् दुसऱ्यांना 'टोप्या' :** दरम्यान शुभारंभ असल्यामुळे सर्वप्रथम एका शेतकऱ्याने बैलगाडीमध्ये आणलेल्या कांद्याचा लिलाव करण्यात येऊन 1211 रुपये प्रति क्विंटल भाव देण्यात येऊन त्या शेतकऱ्याचा टोपी घालून सत्कारही करण्यात आला. त्यामुळे आपल्या कांद्यालाही चांगला भाव मिळेल. अशी अपेक्षा सर्वांनाच होती. परंतु बैलगाडीतील लिलाव झाल्यानंतर व्यापाऱ्यांनी त्या तुलनेत अन्य वाहनांतील कांद्याचे थेट अर्धे भाव लिलावात करून 'धमाल' केली. अगोदरच्या शेतकऱ्याचा टोपी घालून सत्कार आणि नंतरच्या शेतकऱ्यांच्या कांद्याला कमी भाव देऊन व्यापाऱ्यांनी त्यांना 'टोप्या' घातल्या. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हक्काची व विश्वासाची हीच बाजारपेठ आहे काय? असा सवालही अनेकांनी उपस्थित केला. खासगी बाजार समितीच्या शुभारंभाच्या दिवशी चांगला भाव मिळेल. या आशेने कांद्याचे वाहन घेऊन गेलो होतो. परंतु हा कांदा खरेदीचा नव्हे तर शेतकऱ्यांना लुटण्याचा शुभारंभ होता. कमी दरामुळे मी वाहन घरी घेऊन आलो. **– गोकुळ साळुंके, शेतकरी, घायगाव**

शुभारंभाच्या पार्श्वभूमीवर आम्ही तीन दिवसांपूर्वीच वाहन लिलावासाठी लावले. परंतु आज लिलावात कांद्याचा भाव कमी आल्याने भ्रमनिरास झाला. दर दिवसाच्या खुटीप्रमाणे वाहनाचेच तीन हजार रुपये भाडे झाले. **– अप्पासाहेब चव्हाण, शेतकरी, जांबरगाव**

परंतु शुभारंभाच्या दिवशीच शेतकऱ्यांच्या पदरी निराशा आली. शासनाच्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कांदा बाजारापेक्षा खासगी बाजार समितीमध्ये तरी कांद्याला चांगला भाव मिळेल. अशी आशा उराशी बाळगून शेतकरी कांदा घेऊन गेले खरे. परंतु हाती 'धुपाटणे आल्याची भावना शेतकऱ्यांची झाली. 'आगीतून निघाले अन् फुफाट्यात पडले' अशा संतप्त शब्दात शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या. कांदा खरेदीचा शुभारंभ असल्यामुळे भाव चांगला मिळेल. परंतु व्यापाऱ्यांनी लिलावात 500 रुपये प्रति क्विंटल बोली लावल्याने शेतकरी बिथरले अन् त्यांनी गोंधळ घालून लिलावच बंद पाडला. शेतकऱ्यांचा रुद्रावतार पाहून व्यापाऱ्यांनी बाजूला जाऊन खासगीत बोलणी करून पुन्हा शेतकऱ्यांत दाखल झाले. त्यानंतर थोडे म्हणजेच 25 ते 50 रुपये प्रति क्विंटल वाढवून देण्याचा निर्णय घेतल्यानंतर तब्बल दोन तासांनी लिलाव सुरू झाला. वाढवून दिलेले दर समाधानकारक नसले तरी भाडोत्री आणलेली वाहने व थोडा खर्च निघेल. या उद्देशाने कांदा लिलावात विक्री केला. व्यापाऱ्यांनी या चालबाजीमुळे काही शेतकऱ्यांनी कांद्याची वाहने माघारी नेली.

# श्री सद्गुरू योगिराज महाराज यांचे कन्नड नगरीत आगमन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** माजी सभापती जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक दिवंगत कै. अशोक सर्जेराव



मगर पा. यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ हिवरखेडा येथे 11 एप्रील रोजी सकाळी 10 वाजता संत एकनाथ महाराजांचे चौदावे वंशज सदगुरू योगीराज महाराज यांचे जाहीर कीर्तन होणार असुन त्यांचे कन्नड नगरीत जंगी स्वागत करण्यात येणार आहेत असे ॲड. किरण अशोक मगर यांनी सांगीतले. योगीराज महाराज हे (श्रीएकनाथमहाराज संस्थान, श्रीक्षेत्र पैठण) हे महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार , प्रवचनकार म्हणून सुपरिचित आहेत. शांतिब्रह्म श्रीसंत एकनाथ महाराजांचे ते १४ वे वंशज आहेत. घरात परंपरेने चालत आलेल्या वारकरी सांप्रदायाचे संस्कार असल्याकारणाने बालपणापासूनच परमार्थाप्रती त्यांना विशेष रुची निर्माण झाली. महाराज हे जेष्ठ आध्यात्मिक विभूती तथा श्रीएकनाथमहाराज संस्थानाधिपती श्री भैय्यासाहेब महाराज पैठणकर यांचे नातू. योगिराज महाराजांचे पारमार्थिक शिक्षण सद्गुरू श्री जोगमहाराज वारकरी शिक्षणसंस्था आळंदी येथे झाले असून तेथील कीर्तन परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. येथील चार वर्षांचा अभ्यास पूर्ण केल्यानंतर इ. स. २००५ पासून महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या बाहेरही अनेक कीर्तन व्याख्यानांच्याद्वारा वारकरी संप्रदायाचा प्रसार आणि प्रचार करीत आहेत. इ. स. २००६ साली त्यांनी "शांतिब्रह्म श्रीएकनाथमहाराज मिशन,पैठण" या सामाजिक संस्थेची स्थापना केली. श्री जोगमहाराज वारकरी शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्षपूर्तीचे औचीत्त्य साधत त्यांचेद्वारा "Online वारकरीसंप्रदाय अभ्यासक्रम परीक्षा" या नावीन्यपूर्ण प्रकल्पाची सुरुवात करण्यात आली आहे.

# सिंहगड एक्सप्रेसमध्ये शिक्षकाकडून विनयभंग

आधुनिक केसरी न्यूज

**कल्याण :** मुंबई-पुणे सिंहगड एक्सप्रेसमध्ये गुरुवारी सकाळी बिहारचा राज्यातील रहिवासी असलेल्या एका शिक्षकाने कर्जत जवळ एका महिलेचे आपल्या मोबाईलमधून चित्रिकरण केले. त्यानंतर या शिक्षकाने महिलेची छेड काढली. सहप्रवाशांनी हा प्रकार उघडकीस आणल्यानंतर त्याला कल्याण लोहमार्ग पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. कल्याण लोहमार्ग पोलिसांनी या प्रकरणाची तात्काळ चौकशी करुन हा गुन्हा कर्जत रेल्वे पोलीस ठाणे हद्दीत घडला असल्याने तेथे चौकशीसाठी वर्ग केला आहे. मोहमद अश्रफ असे या शिक्षकाचे नाव आहे. लोहमार्ग पोलिसांनी सांगितले, बिहार राज्यातील सितामढी जिल्ह्यातील एका मदरशामध्ये मोहमद अश्रफ शिक्षक आहे.

तो मदरशाच्या कामासाठी मुंबईत येत होता. सिंहगड एक्सप्रेसने प्रवास करत असताना कर्जत रेल्वे स्थानक परिसरात त्याने गुपचूप आपल्या मोबाईलमधून एक्सप्रेस डब्यात बसलेल्या एका महिलेचे चित्रीकरण केले. नंतर तिची छेड काढली. सहप्रवाशांच्या हा प्रकार निदर्शनास येताच त्यांनी मोहमदला जाब विचारला. त्याने केल्या कृत्याची कबुली दिली. सहप्रवाशांनी मोहमदला कल्याण रेल्वे स्थानकात उतरवून त्याला लोहमार्ग पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी त्याच्या विरुध्द गुन्हा दाखल करुन तो कर्जत लोहमार्ग पोलीस ठाण्याकडे चौकशीसाठी वर्ग केला.

# पुणे जिल्ह्यातील उद्धव ठाकरे सेना, राष्ट्रवादीच्या अनेक कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये जाहीर प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** उद्धव ठाकरे सेनेचे पुणे जिल्हा प्रमुख आणि कृष्णा खोरे विकास महामंडळाचे संचालक रामशेठ गावडे पाटील, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या उपाध्यक्ष जयश्री पलांडे, नीरा बाजार समितीचे संचालक भानुकाका जगताप यांच्यासह पुणे जिल्ह्यातील उबाठा सेना, राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी तसेच कार्यकर्त्यांनी बुधवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांनी या सर्वांचे स्वागत केले. प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, भाजपा प्रदेश महामंत्री विक्रांत पाटील, मुरलीधर मोहोळ, जिल्हाध्यक्ष गणेश भेगडे, धर्मेंद्र खांडरे, शरद बुट्टे पाटील, जालिंदर कामठे, आशाताई बुचके, अतुल देशमुख आदी यावेळी उपस्थित होते. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यावेळी म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील गरीब कल्याण कार्यक्रमामुळे , विकास योजनांमुळे देशाची वेगाने प्रगती होत आहे. देशाची मान जगात उंचावली आहे. केंद्रात



मोदी सरकार आणि राज्यात शिंदे - फडणवीस सरकार या डबल इंजिनमुळे महाराष्ट्राचाही विकास वेगाने होत आहे. यामुळेच भाजपा मध्ये प्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढू लागली आहे. पक्षात आलेल्या सर्व कार्यकर्त्यांचा योग्य मान राखला जाईल, असेही ते म्हणाले.

भाजपामध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये प्रिया पवार, राष्ट्रवादीचे माजी सासवड शहर अध्यक्ष संतोष जगताप, रवींद्र गायकवाड, समाधान डोके, गणेश सांडभोर, युवा राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष संदीप देवकर, प्रदिप जगताप,दादा खर्डे,मारुती शेठ शेळके, पानसरे आदींचा समावेश आहे.